महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५

# महाराष्ट्र महामार्ग अधिनियम

(दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. LV of 1955

# The Maharashtra Highways Act

(*As modified upto the 5th November 2015*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याद्वारे प्रकाशित

**२०१५**

[ **किंमत** : रुपये ४१-०० ]

# महाराष्ट्र महामार्ग अधिनियम

## अनुक्रमणिका

**उद्देशिका.**

**कलमे.**


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**महामार्ग जाहीर करणे, महामार्ग प्राधिकारी आणि त्यांचे अधिकार व कार्ये.**

३. रस्ते, मार्ग किंवा जमिनी महामार्ग म्हणून जाहीर करणे.

४. महामार्ग प्राधिकाऱ्यांची नेमणूक.

५. महामार्ग प्राधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.

६. महामार्ग प्राधिकाऱ्याचे अधिकारी व कर्मचारी.

प्रकरण तीन

**ओळीने इमारती बांधण्यावर निर्बंध.**

७. महामार्गाच्या सीमा, पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा ठरविण्याचा अधिकार.

८. नकाशा तयार करणे व सुस्थितीत ठेवणे.

९. महामार्ग सीमा व पुरोभाग रेषा यांच्यामध्ये आणि पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा यांच्यामध्ये इमारतींवर निर्बंध.

१०. अपील.

११. चालू कामे इत्यादींना सूट.

१२. इमारती पुरोभाग रेषेपर्यंत किंवा नियंत्रण रेषेपर्यंत मागे हटवणे.

१३. महामार्गावर जाण्यायेण्याच्या हक्काचे नियमन करणे किंवा तो वळवणे.

१४. महामार्ग प्राधिकार्यांचे व कलम ६ अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे सर्वेक्षण करण्याबाबत अधिकार.

१५. जमीन किंवा जमिनीतील अधिकार किंवा हितसंबंध संपादन करणे.

१६. जमिनीवर खुणा करण्याची व मोजमाप घेण्याची आवश्यकता.

# सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ [1]

[महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.] †

[दिनांक १३, डिसेंबर १९५५ रोजी राष्ट्रपती यांची अनुमती मिळाल्यावर दिनांक २२ डिसेंबर १९५५ रोजी " मुंबई सरकारचे राजपत्र " भाग चार, सर्वसाधारण, यात प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

[२२ डिसेंबर १९५५]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम या अन्वये अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ (१-१-२०००)*

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ (२२-८-२०१२)*

**महामार्गावर ओळीने इमारती बांधण्यावर निर्बंध घालण्यासाठी, त्यावरील अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी व ते काढून टाकण्यासाठी, महामार्ग बांधण्यासाठी, ते सुस्थितीत राखण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी, सुधारणा आकार बसवण्यासाठी आणि इतर विवक्षित बाबीसाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महामार्गावर ओळीने इमारती बांधण्यावर निर्बंध घालण्यासाठी, त्यावरील अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी व ते काढून टाकण्यासाठी, महामार्ग बांधण्यासाठी, ते सुस्थितीत राखण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी, सुधार आकार बसवण्यासाठी आणि इतर विवक्षित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहेत :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमाला [2] महाराष्ट्र महामार्ग अधिनियम असे म्हणावे.

[3][ (२) तो सबंध महाराष्ट्र राज्यास लागू आहे.]

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **मुंबई शासन राजपत्र,** १९५४, भाग पाच, पृष्ठ ३३० पहा.

† महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलात असलेला मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५, आणि त्याखाली केलेले नियम, हे याद्वारे महाराष्ट्र राज्याच्या उरलेल्या भागात लागू करण्यात आले आहेत. (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ पहा).

[2] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या अनुसूचीतील अनुक्रमांक ५८ अन्वये मूळ शीर्षकात सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे १९६० पासून अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल.

[3] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ३(अ) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

(३) [१] [ हे कलम सबंध राज्यात अंमलात राहील.] राज्य सरकारला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या बाकीच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही तरतुदी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात व अशा तारखेस ** अंमलात येतील असा निदेश देता येईल ;

मात्र, राज्य सरकारला, तशाच रीतीने अधिसूचना काढून, अशा क्षेत्रातील कोणताही रस्ता किंवा मार्ग किंवा रस्त्यांचा किंवा मार्गांचा वर्ग या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतूदींच्या अंमलबजावणींतून वगळता येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(अ) " पशू " म्हणजे कोणताही पाळीव किंवा बंदिस्त ठेवलेला पशू ;

(ब) " इमारत " या शब्दामध्ये कसल्याही सामानाच्या व कोणत्याही रीतने बांधलेल्या (शेतीच्या प्रयोजनासाठी असलेली शेतातील इमारत धरून) कोणत्याही बांधकामाचा समावेश होतो आणि तीत जोते. दरवाजाच्या पायऱ्या, भिंती (आवराच्या भिंती व कुंपणे धरून) व तत्सम बांधकामाचाही समावेश होतो ;

(क) " पुरोभाग रेषा " म्हणजे कोणत्याही महामार्गाच्या किंवा महामार्गाच्या भागाच्या दोन्ही बाजूंस, कलम ७, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचनेद्वारा अशा महामार्गाच्या किंवा त्यांच्या भागाच्या संबंधात ठरवलेली रेषा ;

(ड) " छावणी " म्हणजे कटक अधिनियम, १९२४ अन्वये स्थापन केलेली छावणी ; १९२४ चा २.

(ई) " नियंत्रण रेषा " म्हणजे महामार्गाच्या किंवा महामार्गाच्या भागाच्या दोन्ही बाजूस पुरोभाग रेषेच्या पलीकडे, कलम ७, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचनेद्वारा अशा महामार्गाच्या किंवा भागाच्या संबंधात ठरवलेली रेषा ;

(फ) " अतिक्रमण " म्हणजे कोणत्याही महामार्गाचा किंवा त्याच्या भागाचा कोणताही अनधिकृत भोगवटा, आणि त्यात,—

(एक) महामार्गावर किंवा महामार्गाच्या वर किंवा त्यावर येणारी कोणतीही इमारत किंवा तर बांधकाम, सज्जे, द्वारमंडप किंवा इमारतीचा पुढे आलेला भाग अनधिकृतपणे उभारणे ;

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ३ (ब) अन्वये " हे कलम तात्काळ अंमलात येईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

** कलमे २ ते ७४ (दोन्ही धरून) आणि मुंबई उपनगर जिल्हा व ठाणे जिल्ह्याकरिता अनुसूची दिनांक ८ जुलै १९६० रोजी अंमलात आली. पहा–शासकीय अधिसूचना बी व सी.डी. क्रमांक बीएचए ३७६०-सी(१), दिनांक ७ जुलै १९६०.

** कलमे २ ते ७४ (दोन्ही धरून) आणि मुंबई शहराकरिता अनुसूची दिनांक ११ मे, १९६२ रोजी अंमलात आली. पहा—शासकीय अधिसूचना बी व सी.डी. क्रमांक बीएचए ३७६१/५३४-सी (दोन) दिनांक ३ मे, १९६२.

** कलमे २ ते ७४ (दोन्ही धरून) आणि कुलाबा जिल्ह्याकरिता अनुसूची दिनांक ३ सप्टेंबर, १९६४ रोजी अंमलात आली. पहा—शासकीय अधिसूचना बी व सी.डी. क्रमांक बीएचए ३७६३/५२९०२-सी (३) दिनांक २८ ऑगस्ट, १९६४.

** २८ एप्रिल, १९६७ पहा—शासकीय अधिसूचना बी व सी.डी. क्रमांक बीएचए ३७६५/११६३ ४८-सी (१) दिनांक १९ एप्रिल १९६७.

(दोन) विहित कालावधी असल्यास अशा कालावधीनंतर इमारतीचे सामान किंवा कोणत्याही इतर वर्णनाचा माल रचून ठेवण्यासाठी, विक्रीकरता वस्तू दाखवण्यासाठी, खांब, शामियाने, तंबू, मंडप, जाहिरात फलक व इतर तत्सम बांधकामे उभारण्यासाठी किंवा वाहने उभी करण्यासाठी किंवा पशूंना बांधून ठेवण्यासाठी किंवा कोणत्याही इतर प्रयोजनासाठी महामार्गाचा अनधिकृतपणे भोगवटा करणे ; आणि

(तीन) कोणत्याही महामार्गावर किंवा अशा महामार्गाच्याखाली अनधिकृतपणे केलेले किंवा महामार्गापर्यंत नेलेले कोणत्याही प्रकारचे उत्खनन किंवा ढीग ;

यांचा समावेश होतो ;

(ग) इमारतीच्या संबंधात " उभारणे " या संज्ञेचा अर्थ, व्याकरणदृष्ट्या तीत होणाऱ्या फेरफारांसह, एखादी इमारत बांधणे, पुन्हा बांधणे, वाढवणे किंवा तिच्या रचनेत फेरफार करणे असा होतो ;

(ह) जमिनीच्या कोणत्याही तुकड्यांच्या संबंधात " उत्खननन " यामध्ये, ज्या कामात त्या जमिनीच्या तुकड्याचा पृष्ठभाग उकरण्यात येत नाही अशा कोणत्याही कामाचा समावेश होत नाही, परंतु तीत, विहिरी व तळी यांचा समावेश होतो ;

(आय) " महामार्ग " म्हणजे कलम ३ अन्वये महामार्ग म्हणून जाहीर केलेला कोणताही [१] [ रस्ता मार्ग किंवा जमीन ] या संज्ञेत,—

(एक) महामार्ग बांधण्याच्या दृष्टीने संपादन केलेली किंवा सीमांकित केलेली कोणतीही जमीन ;

(दोन) अशा रस्त्याला किंवा मार्गाला संलग्न असलेले उतार, कठडे, दफनभूमिचे खड्डे, पदपथ, फरसबंदी, रस्ता व बाजूचे पाणी अडवण्याचे व सीमा जलनिकास ;

(तीन) अशा रस्त्यावर किंवा मार्गावर किंवा त्यावरून बांधलेले सर्व पूल, नाले, सेतुमार्ग, गाडीरस्ते व इतर बांधकामे ; आणि

(चार) झाडे, कुंपणे, खांब, सीमा, फर्लांगाचे व मैलांचे दगड व महामार्गासाठी लागणारी इतर उपसाधने व सामान व रस्त्यावर किंवा मार्गावर रचून ठेवलेले सामान यांचा समावेश होतो ;

(ज) " महामार्ग प्राधिकारी " म्हणजे कलम ४ अन्वये असा प्राधिकारी म्हणून नेमलेला किंवा ज्याच्याकडे अशा प्राधिकाऱ्याची कामे सोपवलेली आहेत असा प्राधिकारी ;

(के) " महामार्ग सीमा " म्हणजे कलम ७, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचनेद्वारे एखाद्या महमार्गाच्या संबंधात ठरवलेल्या अशा महामार्गाच्या सीमा ;

(ल) " जाण्यायेण्याचा मार्ग " यामध्ये वाहनांसाठी किंवा पादचाऱ्यांसाठी कोणत्याही जाण्यायेण्याच्या मार्गाचा समावेश होतो—मग तो खाजगी असो किंवा सार्वजनिक असो—व त्यात कोणत्याही रस्त्याचा समावेश होतो ;

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(म) " महामार्गाचा मध्य " म्हणजे महामार्गाच्या सीमांमधील मध्यबिंदू ;

(न) " भोगवटा करणारा " यामध्ये—

(अ) जिच्या संबंधाने भाडे दिले जाते किंवा देण्याजोगे आहे त्या जागेचे भाडे किंवा भाड्याचा कोणताही भाग त्यावेळी जी व्यक्ती मालकास देत असेल किंवा देण्यास जबाबदार असेल अशी कोणताही व्यक्ती ;

(ब) आपल्या जागेत राहणारा किंवा अन्यथा तिचा उपयोग करणारा मालक ;

(क) भाडे माफ असलेला भाडेकरी ;

(ड) कोणतीही जागा भोगवट्यात असलेला लायसन्सधारक ; आणि

(ई) कोणत्याही जागेचा उपयोग व भोगवटा करण्याबद्दल मालकास नुकसानभारपाई देण्यास जबाबदार असेल अशी कोणतीही व्यक्ती ;

यांचा समावेश होतो ;

(ओ) " मालक " म्हणजे—

(अ) कोणत्याही जागेच्या संदर्भात ती संज्ञा वापरली असेल तेव्हा उक्त जागेचे भाडे घेणारी व्यक्ती किंवा ती जागा भाड्याने दिली असती तर तिचे भाडे घेण्याचा हक्क जिला असता ती व्यक्ती, आणि तीत,—

(एक) मालकाच्या तर्फे असे भाडे घेणारा अभिकर्ता किंवा विश्वस्त ;

(दोन) धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी वापरण्यांत येणाऱ्या कोणत्याही जागेचे भाडे घेणारा किंवा अशी जागा ज्याच्याकडे सोपवण्यात आली आहे किंवा अशा जागेच्या व्यवस्थेशी ज्याचा संबंध आहे असा अभिकर्ता किंवा विश्वस्त ;

(तीन) कोणत्याही सक्षम अधिकारिता न्यायालयाने नेमलेला धारक, जप्त करणारा किंवा व्यवस्थापक ; आणि

(चार) कब्जेगहाणदार ;

यांचा समावेश होतो ;

(ब) कोणत्याही संस्थेचा किंवा निगम निकायाच्या संदर्भात ती संज्ञा वापरली असेल तर, अशा संस्थेचा किंवा निगम निकायाचा व्यवस्थापक ;

(प) " विहित " म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले ;

(क्यू) " रेल्वे प्रशासना " चा भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० मध्ये जो अर्थ दिलेला आहे तोच अर्थ आहे ; १८९० चा ९.

(र) " वाहन " यामध्ये हातगाडी, बिनचाकी गाडी, नांगर, खटारा आणि महामार्गावर वापरता येईल असे कोणत्याही वर्णनाचे चाकांचे वाहन याचा समावेश होतो ;

(स) या अधिनियमात वापरलेल्या " जमीन ", " हितसंबंध असलेल्या व्यक्ती " व " काम करण्याचा हक्क असलेल्या व्यक्ती " या संज्ञाचे, त्यांना भूमि संपादन अधिनियम, १८९४ यात जे अर्थ दिलेले असतील तेच अर्थ असतील. १८९४ चा १.

प्रकरण दोन

## महामार्ग जाहीर करणे, महामार्ग प्राधिकारी आणि त्यांचे अधिकार व कार्ये

**३.** राज्य सरकारला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणताही रस्ता, मार्ग किंवा जमिन महामार्ग म्हणून जाहीर करता येईल व त्यांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल :— रस्ते, मार्ग किंवा जमिनी महामार्ग म्हणून जाहीर करणे.

(एक) राज्य महामार्ग (विशेष),

(दोन) राज्य महामार्ग

(तीन) मुख्य जिल्हा मार्ग

(चार) इतर जिल्हा मार्ग, किंवा

(पाच) ग्राम मार्ग.

**४.** राज्य सरकारला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदीच्या प्रयोजनासाठी [१] [ राज्यातील ] किंवा [२] [ त्यांच्या ] भागांतील सर्व महामार्गांसाठी किंवा उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या [३] [त्यामधील ] कोणत्याही विशिष्ट महामार्गासाठी किंवा महामार्गासाठी कोणत्याही व्यक्तींची किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्याची महामार्ग प्राधिकारी म्हणून नेमणूक करता येईल. महामार्ग प्राधिकाऱ्यांची नेमणुक.

**५.** महामार्ग प्राधिकाऱ्याची नियुक्ती करणाऱ्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन आणि राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशांच्या अधीन, महामार्ग प्राधिकाऱ्याने, महामार्गांवर ओळीने इमारती बांधण्यावर निर्बंध घालण्यासाठी, त्यावरील अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी व ते काढून टाकण्यासाठी आणि वरील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही विषयांवरील आवश्यक आणि आनुषंगिक अशा सर्व बाबींसाठी या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरून अधिकारांचा वापर केला पाहिजे व कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. तसेच, राज्य सरकारच्या मान्यतेस व राज्य सरकार याबाबत देईल अशा सामान्य किंवा विशेष आदेशांचे अधीन राहून, महामार्ग प्राधिकाऱ्याने महामार्ग बांधण्याचे, ते सुस्थितीत राखण्याचे, त्यांचा विकास करण्याचे किंवा ते सुधारण्याचे काम पत्करणे हे कायदेशीर असेल. महामार्ग प्राधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्य.

**६.** या अधिनियमाच्या तरतुदीन्वये किंवा तदनुसार महामार्ग प्राधिकाऱ्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करणे व त्याच्यावर लावलेली कर्तव्ये पार पाडणे त्यास शक्य व्हावे म्हणून राज्य सरकारला अशा प्राधिकाऱ्याच्या हाताखाली काम करण्यास त्यास आवश्यक वाटतील इतके अधिकारी व कर्मचारी नेमता येतील. महामार्ग प्राधिकाऱ्यांचे अधिकारी व कर्मचारी.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ अन्वये " महाराष्ट्र राज्यातील मुंबई क्षेत्रातील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. मुंबई विधि अनुकूल (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये " राज्याच्या " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ अन्वये " महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रातील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

प्रकरण तीन

## ओळीने इमारती बांधण्यांवर निर्बंध

महामार्गाच्या सीमा, पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा ठरवण्याचा अधिकार.

**७.** [१] [(१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणलेल्या कोणत्याही क्षेत्रात, आणि

(एक) कलम ३ अन्वये कोणताही रस्ता, मार्ग किंवा जमीन महामार्ग असल्याचे जाहीर करण्यात आले असेल किंवा महामार्ग बांधण्याचे किंवा त्याची वाढ करण्याचे काम हाती घेण्यात आले असेल किंवा हाती घेण्याचे योजले असेल तेथे, आणि

(दोन) राज्य सरकारला अशा महामार्गाच्या बाबतीत, महामार्गाची सीमा, पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा ठरवणे आवश्यक वाटत असेल तेथे ;

राज्य सरकारला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा महामार्गाच्या बाबतीत महामार्गाची सीमा, पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा ठरवता येईल ;

मात्र, महामार्गाचे स्थान व आवश्यकता किंवा ज्या स्थानिक क्षेत्रातून महामार्ग जात असेल त्या स्थानिक क्षेत्राची स्थिती लक्षात घेऊन, राज्य सरकारने कोणत्याही महामार्गाच्या किंवा त्याच्या भागांच्या संबंधात निरनिराळ्या पुरोभाग रेषा किंवा नियंत्रण रेषा ठरवणे हे कायदेशीर असेल. ]

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्यापूर्वी, कमीत कमी साठ दिवस अगोदर, राज्य सरकारने **शासकीय राजपत्रात** व विहित केलेल्या रीतीने महामार्ग ज्या गावात असेल त्या गावात व जिल्ह्यातील [२] [तालुक्याच्या किंवा महालाच्या] मुख्यालयात एक अधिसूचना प्रसिद्ध करून तीत पोट-कलम (१) अनुसार एक अधिसूचना काढण्याचे आपण योजले आहे असे नमूद केले पाहिजे व अशा अधिसूचने अन्वये ठरवण्याचे योजलेल्या महामार्गाच्या सीमा व नियंत्रण रेषा यांच्यामध्ये असलेल्या सर्व जमिनी व नवीन कामांच्या बाबतीत, यथास्थीती, महामार्ग बांधणे किंवा त्याची वाढ करणे यामुळे ज्यांचा फायदा होईल त्या जमिनीदेखील विनिर्दिष्ट केल्या पाहिजेत व त्या अधिसूचनेबरोबरच अशा अधिसूचनेमुळे बाधा पोचलेल्या ज्या व्यक्तींची अशी अधिसूचना काढण्याबाबत कोणतेही आक्षेप घेण्याची किंवा सूचना करण्याची इच्छा असेल त्या सर्व व्यक्तींना, अशी अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या एक महिन्याच्या आत यापैकी जो कालावधी उशीरा संपत असेल त्या कालावधीत त्यांचे आक्षेप अगर सूचना माहामार्ग प्राधिकाऱ्यास लेखी सादर करण्याविषयी किंवा अशा प्राधिकाऱ्यापुढे हजर राहण्यास फर्माविणारी नोटीस दिली पाहिजे.

(३) महामार्ग प्राधिकाऱ्याने असे सर्व आक्षेप किंवा सूचना, यथास्थिती, विचारात घेतल्यावर किंवा ऐकून घेतल्यानंतर आणि त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही आणखी चौकशी केल्यानंतर, त्याने चालविलेल्या कार्यवाहीच्या अभिलेखांची एक प्रत, आक्षेपांवरील किंवा सूचनांवरील त्याच्या शिफारशी नमूद केलेल्या अहवालाबरोबर राज्य सरकारकडे पाठविली पाहिजे.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ६(१) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ६(२) अन्वये " तालुक्याच्या किंवा महालाच्या " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) जर, पोट-कलम (२) अन्वये आक्षेप किंवा सूचना दाखल करण्यासाठी किंवा त्या ऐकून घेण्यासाठी दिलेली मुदत संपण्यापूर्वी कोणताही आक्षेप किंवा सूचना सादर करण्यात आली नाही तर, राज्य सरकारने ताबडतोब पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्याची कार्यवाही केली पाहिजे असे कोणतेही आक्षेप किंवा सूचना सादर करण्यात आल्या असतील तर, राज्य सरकारने पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेला अभिलेख व अहवाल विचारात घेतला पाहिजे आणि त्यास,—

(अ) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्याचा प्रस्ताव सोडून देता येईल, किंवा

(ब) त्यास योग्य वाटतील अशा कोणत्याही फेरबदलांसह पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढता येईल.

(५) आक्षेपांचा किंवा सूचनांचा विचार करतांना, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्याच्या प्रश्नांवर राज्य सरकारने दिलेला निर्णय अंतीम व निर्णयाक असेल.

नकाशा तयार करणे व सुस्थितीत ठेवणे.

**८.** कोणत्याही महामार्गाच्या संबंधात महामार्ग सीमा, पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा ठरवणारी कलम ७, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत, महामार्ग प्राधिकाऱ्याने ज्या क्षेत्रातून असा महामार्ग जातो त्या क्षेत्राचा एक नकाशा तयार करविला पाहिजे आणि त्यावर महामार्ग सीमा आणि पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा व या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेला इतर कोणताही तपशील यांच्या खुणा करविल्या पाहिजेत आणि त्यात कोणताही फेरफार किंवा वाढ केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत उक्त नकाशात वेळोवेळी दुरुस्ती करविली पाहिजे, आणि असा नकाशा, अशा रीतीने शेवटी दुरुस्त केल्याची तारीख त्यावर दर्शवून तो नकाशा महामार्ग प्राधिकाऱ्याच्या कार्यालयात ठेवला पाहिजे. अशा नकाशावर महामार्ग प्राधिकाऱ्याचा शिक्का असला पाहिजे व तो निरिक्षणासाठी खुला असला पाहिजे. अशा नकाशाच्या प्रती विहित करण्यात येतील अशा इतर ठिकाणीसुद्धा ठेवल्या पाहिजेत.

महामार्ग सीमा व पुरोभाग रेषा यांच्यामध्ये आणि पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा यांच्यामध्ये इमारतीवर निर्बंध

**९.** (१) त्यावेळी अंमलात असलेला कोणताही कायदा, रुढी, करार किंवा लेख यात काहीही अंतर्भूत असले तरी, नियत दिवशी किंवा त्यानंतर, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन पुढील निर्बंध अंमलात येतील. ते असे,—

कोणत्याही व्यक्तीने महामार्ग अधिकाऱ्याच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय,—

(अ) यथास्थिती, कलम ७, पोट-कलम (२) अन्वये निश्चित करण्याचे योजिलेले किंवा पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेली महामार्ग सीमा व पुरोभाग रेषा यांच्यामध्ये असलेल्या कोणत्याही जमिनीवर—

(एक) महामार्गाकडे किंवा महामार्गाकडून जाण्यायेण्याचे कोणतेही मार्ग बांधू नयेत, तयार करू नयेत किंवा

(दोन) कोणतीही इमारत उभारू नये, किंवा

(तीन) कोणत्याही विद्यमान इमारतीत महत्त्वाचा फेरफार करू नये, किंवा

(चार) कोणतेही उत्खनन करू नये किंवा त्यात वाढ करू नये, किंवा

(पाच) कोणतीही कामे बांधू नयेत, तयार करू नयेत किंवा आखू नयेत, किंवा

(ब) यथास्थिती, कलम ७, पोट-कलम (२) अन्वये निश्चित करण्याचे योजिलेली किंवा पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेली पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा यांच्यामध्ये असलेल्या कोणत्याही जमिनीवर—

(एक) महामार्गाकडे किंवा महामार्गाकडून जाण्यायेण्याचे कोणतेही मार्ग बांधू नयेत, तयार करू नयेत किंवा आखू नयेत, किंवा

(दोन) कोणतीही इमारत उभारू नये, किंवा

(तीन) कोणत्याही विद्यमान इमारतीत महत्त्वाचा फेरफार करू नये.

(क) महामार्ग प्राधिकाऱ्याच्या मते या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होईल अशा रितीने कोणत्याही इमारतीचा उपयोग करू नये किंवा आधीच बांधलेल्या कोणत्याही इमारतीच्या उपयोगात कोणताही फेरफार करू नये किंवा ज्या जमिनीवर अशी इमारत बांधलेली असेल त्या जमिनीला लागून असलेल्या एखाद्या महामार्गाच्या उपयोगात हस्तक्षेप करू नये.

(२) पोट-कलम (१) अन्वये अशी परवानगी मिळवू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व यथास्थिती, ज्या बांधकामाच्या फेरफाराच्या उत्खननाच्या, कामाच्या किंवा जाण्यायेण्याच्या मार्गांच्या संबंधात अर्ज असेल ते बांधकाम, फेरफार, उत्खनन, कामे किंवा जाण्यायेण्याचे मार्ग यासंबंधी विहित करण्यात येईल असा तपशील असलेला लेखी अर्ज महामार्ग प्राधिकाऱ्याकडे केला पाहिजे.

(३) असा अर्ज मिळाल्यावर, महामार्ग प्राधिकाऱ्याने, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, एकतर—

(अ) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन, (तशा शर्ती असल्यास) परवानगी दिली पाहिजे, किंवा

(ब) अशी परवानगी देण्याचे नाकारले पाहिजे :

मात्र—

(एक) कोणताही जमिनीखालील मलप्रणाल, निःसारण, वीज मार्ग, नळवाहिनी किंवा इतर उपकरण संच दुरुस्त करण्याच्या, नवीकरण करण्याच्या, मोठा करण्याच्या किंवा सुस्थितीत राखण्याच्या प्रयोजनासाठी जमिनीत कोणतेही उत्खनन किंवा बांधकाम करण्यास, कोणतीही रचना करण्यास किंवा आखणी करण्यास पोट-कलम (१) खंड (अ) अन्वये परवानगी रोखून ठेवता कामा नये किंवा मलप्रणाल, निःसरण, वीज मार्ग, नळवाहिनी किंवा इतर उपकरण संच यावर रस्ता बांधण्याच्या, सुस्थितीत राखण्याच्या, त्याची वाढ करण्याच्या किंवा सुधारणा करण्याच्या कामास प्रतिबंध होणार नाही किंवा हानी पोचणार नाही असा

रीतीने व अशा पातळीत ठेवण्यात येईल अशी खात्रीलायक व्यवस्था करण्यासाठी आवश्यक असतील अशा शर्तीखेरीज इतर कोणत्याही शर्तीच्या अधीन अशी परवानगी देता कामा नये ;

(दोन) इमारत उभारण्यचे किंवा तीत फेरफार करण्याचे किंवा महामार्गाकडे जाण्यायेण्याच्या कोणत्याही मार्गाची आखणी करण्याचे जे काम सार्वजनिक आरोग्य व कल्याण आणि लागू न असलेल्या रस्त्यांवरील रहदारीची सुरक्षितता व सोय, यांच्या आवश्यकतेनुरुप असेल अशी इमारत उभारण्यास किंवा तीत फेरफार करण्यास किंवा महामर्गाकडे जाण्यायेण्याच्या कोणत्याही मार्गाची आखणी करण्यास पोट-कलम (१) खंड (ब) अन्वये परवानगी रोखून ठेवता कामा नये किंवा गैरवाजवी शर्तींच्या अधीन ती देता कामा नये ;

मात्र, शेतीच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेल्या जाण्यायेण्याच्या मार्गाच्या बाबतीत, अशी परवानगी रोखून ठेवता कामा नये किंवा अशा जाण्यायेण्याच्या मार्गांचा फक्त शेतीच्या प्रयोजनांसाठीच वापर करण्यात येईल अशी खात्रीलायक तरतूद करण्याच्या दृष्टीने आवश्यक असतील अशा शर्तीखेरीज इतर कोणत्याही शर्तीच्या अधीन ठेवून ती देता कामा नये ;

(तीन) नियत दिवसापूर्वी अस्तित्वात असलेली एखादी इमारत पुन्हा बांधताना किंवा तीत फेरफार करताना तिच्या बाह्य स्वरुपात कोणताही महत्वाचा फेरफार करावयाचा नसेल तर ती इमारत पुन्हा बांधण्यासाठी किंवा तीत फेरफार करण्यासाठी पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये परवानगी रोखून ठेवता येणार नाही किंवा अशी परवानगी कोणत्याही निर्बंधाच्या अधीन दिली जाणार नाही.

(४) जेव्हा महामार्ग प्राधिकारी परवानगी नाकारील तेव्हा, त्याबद्दलची कारणे नमूद करण्यात आली पाहिजेत व ती अर्जदारास कळविली पाहिजेत :

मात्र, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे एखाद्या व्यक्तीस, वर सांगितल्याप्रमाणे कळवण्यात आलेल्या ज्या आक्षेपार्ह गोष्टींमुळे अशी परवानगी नाकारण्यात आली होती त्या गोष्टी त्यातून वगळल्या नंतर त्यास नवीन अर्ज करण्यास मनाई करता कामा नये.

(५) अर्जदाराचे नाव व पत्ता विनिर्दिष्ट केलेला अर्ज अशा परवानगीसाठी महामार्ग प्राधिकाऱ्यास सादर केल्यावर तीन महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर, किंवा महामार्ग प्राधिकाऱ्याने अधीसुचित केला असेल असा तीन महिन्यांहून अधिक नसणारा आणखी कालावधी लोटल्यावर त्या पत्त्यावर अर्जदारास कोणताही निर्णय पाठवून लेखी कळवला नसेल किंवा पोस्टाने पाठवला नसेल किंवा त्याच्या स्वाधीन केला नसेल तर, (महामार्ग प्राधिकारी व अर्जदार यांच्यामध्ये अन्यथा लेखी करार होईल त्याव्यतिरिक्त) महामार्ग प्राधिकाऱ्याने कोणत्याही शर्ती लावल्यावाचून परवानगी दिली आहे असे मानले जाईल.

(६) महामार्ग प्राधिकाऱ्याने, या कलमान्वये त्याने दिलेल्या किंवा नाकारलेल्या परवानगीची पुरेशा तपशीलासह एक नोंदवही ठेवली पाहिजे व ती नोंदवही हितसंबंध असलेल्या व्यक्तींना पाहण्यासाठी विनामूल्य मिळण्याजोगी असली पाहिजे आणि अशा व्यक्तींना त्यामधून उतारे घेण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण**.— या कलमाच्या प्रयोजनासाठी कोणतीही महामार्ग सीमा, पुरोभाग रेषा किंवा नियंत्रण रेषा यांच्या संदर्भात " नियत दिवस " म्हणजे,—

(१) ज्या दिवशी अशी महामार्ग सीमा, पुरोभाग रेषा किंवा नियंत्रण रेषा निश्चित करण्याचे योजणारी अधिसूचना कलम ७, पोट-कलम (२) अन्वये **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आली असेल तो दिवस, आणि

(२) अशी महामार्ग सीमा, पुरोभाग रेषा किंवा नियंत्रण रेषा यात कोणताही फेरबदल केला असेल तर, ज्या दिवशी अशी महामार्ग सीमा, पुरोभाग रेषा किंवा नियंत्रण रेषा निश्चित करणारी अधिसूचना कलम ७, पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध करण्यात आली असेल तो दिवस.

अपील.

**१०.** (१) जर कोणताही अर्जदार, महामार्ग प्राधिकाऱ्याने कलम ९ अन्वये परवानगी रोखून ठेवणाऱ्या किंवा कोणतीही शर्त लादणाऱ्या निर्णयामुळे व्यथित झाला असेल तर, त्यास त्या तारखेस असा निर्णय कळवण्यात आला होता त्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत त्यास राज्य शासनाकडे अपील करता येईल.

(२) राज्य शासनाला, अर्जदारास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, अपिलावर त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल आणि राज्य सरकारचा निर्णय अंतिम असेल.

चालू कामे इत्यादिंना सूट.

**११.** (१) कलम ९ अन्वये अंमलात असलेले कोणतेही निर्बंध कलम ९ मध्ये उल्लेख केलेल्या, नियत दिवसापूर्वी सुरू केलेल्या इमारत उभारणीस किंवा इमारत तयार करण्यास किंवा कोणतेही उत्खनन करण्यास किंवा कोणताही जाण्यायेण्याचा मार्ग बांधण्यास, तयार करण्यास किंवा आखणी करण्यास लागू असणार नाही.

(२) जाण्यायेण्याचा मार्ग बांधणे, तयार करणे किंवा आखणे या संबंधीच्या निर्बंधाखेरीज, कलम ९ अन्वये अंमलात असलेले कोणतेही निर्बंध दफनभूमि किंवा दहनभूमि किंवा मृतांची विल्हेवाट लावण्याची इतर जागा यांचा भाग असलेल्या ज्या जमिनीचा उपयोग हा अधिनियम संमत होण्यापूर्वी अशा प्रयोजनासाठी करण्यात येत असेल अशा कोणत्याही जमिनीस लागू असणार नाहीत.

(३) कलम ९ अन्वये अंमलात असलेले कोणतेही निर्बंध, हे निर्बंध अंमलात आल्याच्या तारखेपूर्वी किंवा महामार्ग प्राधिकाऱ्याच्या संमतीने त्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर त्या जमिनीत किंवा जमिनीवर शेतीच्या प्रयोजनांसाठी बांधलेले कोणतेही जलनिःसारण, खंदक किंवा जलनिःसारणाची इतर कामे किंवा त्यांच्या संबंधात आवश्यक असलेले कोणतेही कायम स्वरुपाचे उत्खनन किंवा कामे किंवा बांधलेले कोणतेही मलप्रणाल, निःसारण, वीज मार्ग, नळवाहिन्या किंवा इतर उपकरण संच यांची दुरुस्ती, नवीकरण किंवा ते मोठे करण्यासाठी किंवा ते सुस्थितीत राखण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही कामांना लागू असणार नाहीत.

इमारती पुरोभाग रेषेपर्यंत किंवा नियंत्रण रेषेपर्यंत मागे हटवणे.

**१२.** जेव्हा कलम ९ मध्ये उल्लेख केलेल्या, नियत दिवसापूर्वी उभारलेली कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग पुरोभाग रेषा व महामार्गाचा मध्यभाग यांच्यामध्ये असेल तेव्हा, महामार्ग प्राधिकारी, जेव्हा अशी कोणतीही इमारत किंवा भाग पूर्णपणे किंवा बहुतांशी पाडण्यात आला असेल, जळून गेला असेल किंवा पडला असेल तेव्हा नोटीस देऊन, अशी इमारत किंवा भाग पुन्हा उभारताना पुरोभाग रेषेपर्यंत किंवा नियंत्रण रेषेपर्यंत मागे हटवण्यास सांगू शकेल.

१३. (१) महामार्ग प्राधिकाऱ्यास, रहदारीच्या सुरक्षिततेच्या किंवा सोयीच्या दृष्टीने तसे करणे त्यास आवश्यक वाटल्यास, महामार्गावर जाण्यायेण्याच्या कोणत्याही विद्यमान हक्काचे नियमन करता येईल किंवा तो नियंत्रण रेषा व महामार्ग सीमा यांच्यामधील जमिनीपलिकडे वळवता येईल ; महामार्गावर जाण्यायेण्याचा हक्काचे नियमन करणे किंवा तो वळविणे.

मात्र, जाण्यायेण्याचा पर्यायी मार्ग देण्यात येईपर्यंत जाण्यायेण्याचा विद्यमान हक्क वळवता येणार नाही.

(२) जेव्हा जाण्यायेण्याचा विद्यमान हक्क वळवण्यात येईल तेव्हा, महामार्गावर जाण्यायेण्याचा पर्यायी मार्ग ज्या ठिकाणी देण्यात आला असेल ते ठिकाण विद्यमान ठिकाणापासून गैरवाजवी अंतरावर असता कामा नये.

(३) ज्या तारखेस जाण्यायेण्याचा विद्यमान हक्क वळवण्यात आला असेल व जाण्या-येण्याचा पर्यायी मार्ग देण्यात आला असेल ती तारीख महामार्ग प्राधिकाऱ्याने, **शासकीय राजपत्रात** अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केली पाहिजे.

**१४.** या अधिनियमाच्य कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी महामार्ग प्राधिकारी व कलम ६ अन्वये नेमलेले अधिकारी व कर्मचारी यांना,— महामार्ग प्राधिकाऱ्यांचे व कलम ६ अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे सर्वेक्षण करण्याबाबत अधिकार

(अ) कोणत्याही जमिनीवर प्रवेश करता येईल, तिचे सर्वेक्षण करता येईल व तिचे मोजमाप व पातळी घेता येईल ;

(ब) अशा पातळीच्या खुणा करता येतील, कोणत्याही जमिनीच्या खालच्या थरातील माती खणता येईल किंवा विंधता येईल ;

(क) महामार्गाच्या दोन्ही बाजूंस सबंध रस्त्यावर अंतराअंतराने दगड किंवा टिकाऊ स्वरुपाच्या निरनिराळ्या रंगातील इतर खुणा, अशा दगडांना किंवा खुणांना जोडणारी काल्पनिक रेषा रस्त्याची सिमा बिनचूकपणे दर्शवील अशा रीतीने, रोवून महामार्गाचे सीमांकन करता येईल ;

(ड) रस्त्याच्या सीमेस वळणे किंवा वाकणे असतील तर, दगड किंवा निरनिराळ्या रंगातील खुणा सरळ रेषेने जोडल्या असता सीमेची बिनचूक रुपरेषा मिळेल अशा रीतीने असे दगड किंवा निरनिराळ्या रंगातील खुणा बसवता येतील ;

(ई) असे सीमा दर्सविणारे दगड किंवा खुणा यांना लागोपाठचे क्रमांक देता येतील आणि महामार्गाचा भाग असल्याप्रमाणे ते जमिनीवर सुस्थितीत ठेवता येतील ;

(फ) निरनिराळ्या रंगातील खुणा करून व इतर चर खणून पुरोभाग व नियंत्रण रेषा आखता येईल ;

(ग) जर अन्यथा सर्वेक्षण करता येत नसेल किंवा पातळी किंवा मोजमाप घेता येत नसेल, सीमांच्या खुणा करता येत नसतील व रेषा आखता येत नसतील तर, कोणतेही उभे पीक, झाड, कुंपण किंवा जंगल किंवा कोमताही भाग तोडता येईल व काढून टाकता येईल ;

(ह) त्याबाबत आवश्यक असतील अशी इतर सर्व कृत्ये करता येतील ;

मात्र, महामार्ग प्राधिकाऱ्यास, कोणत्याही जागेच्या भोगवटादाराची संमती असल्याशिवाय व अशा जागेत प्रवेश करण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल निदान अठ्ठेचाळीस तासांची लेखी नोटीस अशा भोगवटादाराला दिल्यावाचून अशा जागेत प्रवेश करता येणार नाही किंवा कोणत्याही अधिकाऱ्यास, किंवा कर्मचाऱ्यास प्रवेश करण्याची परवानगी देता येणार नाही.

जमीन संपादन करणे इ. चे अधिकार

[1][**१५.** (१) महामार्ग प्राधिकरणास या अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही जमीन, लोकहिताच्या प्रयोजनार्थ आवश्यक असलेली जमीन असल्याचे मानण्यात येईल आणि प्राधिकरणाकडून विनंती करण्यात आल्यानंतर अशी जमीन या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये, राज्य शासनाकडून त्या प्राधिकरणाकरिता संपादन करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्यानुसार राज्य शासनाकडे महामार्ग प्राधिकरणाने अशी मागणी केल्यानंतर आणि लोकहितार्थ, अशा महामार्गाचे किंवा त्याच्या भागाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यचालन यासाठी अशी जमीन आवश्यक आहे याबाबत राज्य शासनाची खात्री पटल्यावर अशी जमीन संपादन करण्याबाबतचा आपला उद्देश राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जाहीर करील :

परंतु, संपादन करण्यात येणार असलेली जमीन अनुसूचित क्षेत्रात असेल तर, राज्य शासन किंवा या बाबतीत प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी, अशी जमीन संपादन करण्याचा आपला इरादा जाहीर करण्यापूर्वी, राज्य शासनाने या बाबतीत काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे घालून देण्यात येईल अशा रीतीने,—

(एक) जर ती जमीन एखाद्या गावाच्या हद्दीमध्ये येत असेल तर, संबंधित ग्रामसभेबरोबर किंवा पंचायतीबरोबर ;

(दोन) जर ती जमीन एका गटातील एकापेक्षा अधिक पंचायतींच्या हद्दीमध्ये येत असेल तर, संबंधित पंचायत समितीबरोबर ;

(तीन) जर ती जमीन एका जिल्ह्यातील एकापेक्षा अधिक गटांच्या हद्दीमध्ये येत असेल तर, संबंधित जिल्हा परिषदेबरोबर ;

विचारविनिमय करील.

**स्पष्टीकरण.**— या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(एक) "ग्रामसभा" आणि "अनुसूचित क्षेत्र" या शब्दप्रयोगाचा अर्थ, * मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यामध्ये त्यांना अनुक्रमे नेमून दिलेल्या अर्थानुसार असेल. १९५९ चा मुंबई ३.

(दोन) " पंचायत समिती " आणि " जिल्हा परिषद " या शब्दप्रयोगांचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यामध्ये त्यांना अनुक्रमे नेमून दिलेल्या अर्थानुसार असेल. १९६२ चा महा ५.

(३) पोट-कलम (२) खाली काढलेल्या प्रत्येक अधिसूचनेमध्ये त्या जमिनीचे संक्षिप्त वर्णन दिलेले असेल.

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ कलम २ अन्वये कलमे १५ ते १९ याऐवजी ही कलमे बदली दाखल करण्यात आली.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या अनुसूचीतील नोंदीअन्वये मूळ शिर्षकात सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे १९६० पासून अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल

(४) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, जमीन संपादन करण्यासाठी, राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी (यात यापुढे ज्यास " भूमी संपादन अधिकारी " असे संबोधण्यात आले आहे) या अधिसूचनेचा आशय, कोणत्याही दोन स्थानिक वृत्तपत्रांत-ज्यापैकी एक वृत्तपत्र देशी भाषेतले असेल,–प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

**१६.** कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यावर, भूमि संपादन अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाकडून या संबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने— सर्वेक्षण इत्यादी करण्यासाठी प्रवेश करण्याचा अधिकार

(अ) कोणतीही तपासणी, सर्वेक्षण, मोजणी, मूल्यमापन किंवा चौकशी करणे ;

(ब) पातळी मोजणे ;

(क) आंतर-मृद्रेत खणणे किंवा विंधण करणे ;

(ड) सीमारेषा किंवा बांधकामाच्या प्रस्तावित रेषा निश्चित करणे ;

(ई) चिन्हे लावून व चर खणून अशा पातळ्या, सीमारेषा व प्रस्तावित रेषा चिन्हांकित करणे ; किंवा

(फ) विहित करण्यात येईल अशी अन्य कामे किंवा गोष्टी करणे ;

हे विधिसंमत असेल.

**१७.** (१) महामार्ग प्राधिकरणाने कलम ७ अन्वये काढलेल्या अधिसूचनेच्या उत्तरादाखल ज्या व्यक्तींनी आक्षेप किंवा सूचना पाठवल्या होत्या, व ज्यावर महामार्ग प्राधिकरणांकडून यापूर्वीच विचार करण्यात आला किंवा ह्या बाबतीतील त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले अशा व्यक्तींखेरीज अशा जमिनीत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये, अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत त्या पोट-कलमात नमूद केलेल्या प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी त्या जमिनीचा वापर करण्यास आक्षेप घेता येईल. आक्षेपांची सुनावणी

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक आक्षेप भूमि संपादन अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात केली जाईल आणि त्यामागील कारणे ही त्यात नमूद करण्यात येतील आणि भूमि संपादन अधिकारी अशा आक्षेपकर्त्यास त्याचे म्हणणे एकतर स्वतः किंवा विधि व्यवसायीमार्फत मांडण्याची संधी देईल आणि अशा सर्व आक्षेपांची सुनावणी झाल्यानंतर व त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करावयाची असल्यास ती केल्यानंतर, तो आदेशाद्वारे असे आक्षेप एकतर मान्य करेल किंवा अमान्य करेल.

१९६१ चा २५. **स्पष्टीकरण.**— या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " विधि व्यवसायी " याचा अर्थ, अधिवक्ता अधिनियम, १९६१ याच्या कलम २ चे पोट-कलम (१), खंड (एक) मध्ये दिलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

(३) भूमि संपादन अधिकाऱ्याने पोट-कलम (२) खाली काढलेला कोणताही आदेश अंतिम असेल.

**१८.** (१) कलम १७ च्या पोट-कलम (१) खाली, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, जर भूमि संपादन अधिकाऱ्याकडे कोणताही आक्षेप दाखल करण्यात आला नाही किंवा भूमि संपादनाचे घोषणापत्र.

संपादन अधिकाऱ्याने त्या कलमाच्या पोट-कलम (२) खाली आक्षेप अमान्य केला असेल तर, भूमि संपादन अधिकारी, शक्य होईल तितक्या लवकर, राज्य शासनाकडे तद्नुसार, अहवाल सादर करेल आणि असा अहवाल मिळाल्यावर, **राज्य शासन**, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कलम १५ च्या पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी ती जमीन संपादन करण्यात यावी अशी घोषणा करेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये असे घोषणापत्र प्रसिद्ध झाल्यानंतर, ती जमीन सर्व भारांपासून मुक्त होऊन राज्य शासनाकडे पूर्णपणे निहित होईल.

(३) ज्यावेळी, कोणत्याही जमिनीच्या संबंधात, तिच्या संपादनाबाबत कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध केलेली असेल, परंतु पोट-कलम (१) अन्वये, ती अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षाच्या आत कोणतेही घोषणापत्र प्रसिद्ध झाले नसेल तर, उक्त अधिसूचना अंमलात असण्याचे बंद होईल ;

परंतु, उक्त एक वर्षाच्या कालावधीची गणना करताना, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनेनुसार करावयाच्या कोणत्याही कृतीस किंवा कार्यवाहीस न्यायालयाच्या आदेशाद्वारे ज्या कालावधी किंवा कालावधींमध्ये तहकुबी मिळालेली असेल, असा कालावधी किंवा असे कालावधी, वगळण्यात येतील.

(४) पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने केलेल्या घोषणापत्रास कोणत्याही न्यायलयात किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाद्वारे हरकत घेतली जाणार नाही.

कब्जा घेण्याचे अधिकार.

**१९.** (१) कलम १८ च्या पोट-कलम (२) अन्वये, जेव्हा राज्य शासनाकडे कोणतीही जमीन निहित असेल आणि अशा जमिनीकरिता, कलम **१९ ब** अन्वये, भूमि संपादन अधिकाऱ्याने ठरवून दिलेली रक्कम, कलम **१९ क** च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने भूमि संपादन अधिकाऱ्याकडे जमा केलेली असेल, तेव्हा भूमि संपादन अधिकारी, लेखी नोटीशीद्वारे, त्या जमिनीच्या मालकाला, तसेच अशा जमिनीच्या कब्जा असणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीला अशा जमिनीचा कब्जा सोडून देण्यास किंवा तिचा कब्जा भूमि संपादन अधिकाऱ्याकडे किंवा या बाबतीत त्याने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीकडे, अशी नोटीश बजावल्यापासून आठ दिवसांचे आत स्वाधीन करण्याचा निर्देश देईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या निदेशांचे पालन करण्यास जर कोणत्याही व्यक्तीने नकार दिला किंवा त्याचे पालन करण्यात त्या व्यक्तीने कसूर केली तर, भूमि संपादन अधिकारी,—

(अ) महानगरक्षेत्राच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही क्षेत्रात असलेल्या जमिनीबाबत, पोलीस आयुक्ताकडे अर्ज करील ;

(ब) खंड (अ) मध्ये निर्देशिलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर कोणत्याही क्षेत्रात असलेल्या जमिनीबाबत त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करील ;

आणि असा आयुक्त किंवा जिल्हाधिकारी, यथास्थिती, ती जमीन भूमि संपादन अधिकाऱ्यांच्या किंवा त्याने यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या स्वाधीन करण्याची कार्यवाही करील.

**१९ अ.** ज्यावेळी कलम १८ अन्वये राज्य शासनाकडे जमीन निहित असेल त्यावेळी, भूमि संपादन अधिकारी किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेली इतर कोणतीही व्यक्ती यांनी, जमिनीवर प्रवेश करणे आणि इमारती बांधणे, त्यांची परिरक्षा करणे, महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे व्यवस्थापन किंवा परिचालन करणे किंवा त्याच्याशी संबंधित इतर कोणतीही कामे करणे, हे विधिसंमत असेल. राज्य शासनाकडे निहित असल्यास त्या जमिनीवर प्रवेश करण्याचा हक्क.

**१९ ब.** (१) जेव्हा राज्य शासनाने या प्रकरणाखाली कोणतीही जमीन संपादन केली असेल तेव्हा या कलमाच्या तरतुदीनुसार ठरवण्यात येईल एवढी भरपाईची रक्कम देण्यात येईल. भरपाईची म्हणून देय असलेली रक्कम ठरवणे.

(२) जेव्हा राज्य शासन आणि भरपाई मिळणारी व्यक्ती यांच्यामध्ये करार होऊन भरपाईची रक्कम ठरवण्यात आली असेल तर ती अशा करारानुसार ठरवण्यात येईल.

(३) जेव्हा असा करार केला नसेल, तेव्हा राज्य शासन अशा संपादनाकरिता द्यावयाच्या भरपाईची रक्कम आणि अशी भरपाई कोणत्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना द्यावयाची हे सुद्धा ठरवण्यासाठी, ही बाब भूमि संपादन अधिकाऱ्यापुढे ठेवील ;

परंतु, राज्य शासन सर्वसाधारण आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा रकमेपेक्षा अधिक रक्कम, भूमी संपादन अधिकारी, राज्य शासनाच्या किंवा या बाबतीत राज्य शासन नियुक्त करील अशा अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय, ठरवणार नाही.

(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, भूमि संपादन अधिकाऱ्यासमोर, त्या पोट-कलमाखाली ही बाब ठेवल्यानंतर, पण त्याने भरपाईची रक्कम निश्चित करण्यापूर्वी, जर राज्य शासनाने आणि ज्याला भरपाई मिळणार त्या व्यक्तीने करार करून अशी रक्कम निश्चित केली असेल तर भूमि संपादन अधिकारी अशा करारानुसार निश्चित केलेली रक्कम भरपाईची रक्कम म्हणून ठरवील

(५) ज्या बाबतीत कोणत्याही जमिनीवरील उपयोगकर्त्याचा हक्क किंवा सुविधाधिकाराच्या स्वरुपाचा इतर कोणताही हक्क या अधिनियमान्वये संपादित करण्यात येईल त्या बाबतीत जमिनीच्या मालकाला आणि अशा भूमि संपादनामुळे इतर कोणत्याही व्यक्तीच्या त्या जमिनीवरील उपभोगाच्या हक्कास अगदी कोणत्याही तऱ्हेने बाधा पोहोचत असेल अशा व्यक्तीला त्या जमिनीकरिता पोट-कलम (२), किंवा, यथास्थिती, पोट-कलम (३) अन्वये ठरवून दिलेल्या रकमेच्या दहा टक्के रक्कम देण्यात येईल.

(६) पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (५) अन्वये भरपाईची रक्कम ठरवण्याची कार्यवाही सुरू करण्यापूर्वी, भूमि संपादन अधिकारी, दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये, ज्यापैकी एक देशी भाषेतील असेल-जाहीर नोटीस प्रसिद्ध करून, संपादित केल्या जाणाऱ्या जमिनीतील हितसंबंधित सर्व व्यक्तींकडून दावा सांगणारे अर्ज मागवील.

(७) अशा नोटिशीत जमिनींचे तपशील देण्यात येतील आणि तिच्याद्वारे अशा जमिनीत हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना, कलम १७ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे, भूमि संपादन अधिकाऱ्यापुढे, तीत उल्लेखिलेल्या वेळी व ठिकाणी, जातीने किंवा अभिकर्त्यामार्फतकिंवा विधी व्यवसायीमार्फत हजर राहण्यास आणि अशा जमिनीमधील आपापल्या हितसंबंधाचे स्वरूप नमूद करण्यास सांगितले जाईल.

(८) पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (५) अन्वये भूमि संपादन अधिकाऱ्याने ठरवून दिलेली भरपाईची रक्कम दोहोंपैकी कोणत्याही पक्षकाराला मंजूर नसेल तर, दोहोंपैकी कोणत्याही पक्षकाराने तसा अर्ज केल्यास, ही रक्कम, राज्य शासनाने नियुक्त केलेला लवाद ठरवून देईल.

(९) या अधिनियमातील तरतुदींच्या अधीनतेने, लवाद आणि समेट अधिनियम, १९९६ याच्या तरतुदी या अधिनियमाखालील सर्व लवादांना लागू होतील. १९९६ चा २६.

(१०) भूमि संपादन अधिकारी किंवा लवाद, यथास्थिति, पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (८) अन्वये, भरपाईची रक्कम ठरवताना खालील गोष्टी विचारात घेईल,–

(अ) कलम १५ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकाला असलेले जमिनीचे बाजार मूल्य ;

(ब) जमिनीचा कब्जा घेण्याच्या वेळी, अशी जमीन इतर जमिनीपासून वेगळी करण्याच्या कारणामुळे हितसंबंधित व्यक्तीचे, नुकसान झालेले असल्यास, ते नुकसान ;

(क) जमिनीचा कब्जा घेण्याच्या वेळी, जमिनीच्या संपादनाच्या कारणामुळे हितसंबंधित व्यक्तीच्या स्थावर मालमत्तेस किंवा त्याच्या मिळकतीस कोणत्याही रुपात क्षतिकारक रीतीने बाधा पोहोचल्याने नुकसान झालेले असेल तर, ते नुकसान ;

(ड) जर जमिनीच्या संपादनाच्या परिणामी, हितसंबंधित व्यक्तीस, त्याचे राहण्याचे ठिकाण किंवा कामकाजाची जागा बदलणे भाग पडले असेल तर, अशा बदलाच्या अनुषंगाने खर्च झाला असल्यास, असा वाजवी खर्च.

रक्कम जमा करणे आणि प्रदान करणे.

**१९क.** (१) कलम १९ब अन्वये ठरवून दिलेली रक्कम, राज्य शासन भूमि संपादन अधिकाऱ्याकडे, विहितरीतीने जमिनीचा कब्जा घेण्यापूर्वी जमा करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये रक्कम जमा केल्यानंतर ताबडतोब, भूमि संपादन अधिकारी, शासनाच्या वतीने, ती रक्कम तिचा हक्कदार असलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना प्रदान करील.

(३) ज्या बाबतीत, पोट-कलम (१) अन्वये जमा केलेल्या रकमेमध्ये अनेक व्यक्ती हितसंबंधित असल्याचा दावा सांगत असतील त्या बाबतीत, भूमि संपादन अधिकारी, त्याच्या मते, असा दावा सांगणाऱ्यांपैकी रक्कम स्वीकारण्याचा हक्क असणाऱ्या व्यक्ती आणि त्या प्रत्येकीला देय असलेली रक्कम ठरवील.

(४) रकमेचे किंवा तिच्या कुठल्याही भागाचे संविभाजन करताना, जिल्हा ती रक्कम किंवा तिचा इतर कोणताही भाग देय असेल अशा व्यक्तीबाबत जर कोणताही विवाद उत्पन्न झाला तर, भूमि संपादन अधिकारी तो विवाद, ज्याच्या अधिकार क्षेत्रात ही जमीन असेल, अशा मूळ अधिकारितेच्या प्रधान दिवाणी न्यायालयाकडे निर्णयासाठी सोपवील.

(५) ज्या बाबतीत कलम १९ब च्या पोट-कलम (८) अन्वये लवादाने ठरवून दिलेली रक्कम, भूमिसंपादन अधिकाऱ्याने ठरविलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल त्या बाबतीत, लवाद, अशा अतिरिक्त रकमेवर, कलम १९ अन्वये कब्जा घेण्यात आल्याच्या दिनांकापासून ते ती रक्कम प्रत्यक्ष जमा होण्याच्या दिनांकापर्यंतच्या काळासाठी दरसाल नऊ टक्के या दराने व्याज देण्याचा निवाडा देईल.

(६) जेथे लवादाने ठरविलेली रक्कम भूमि संपादन अधिकाऱ्याने ठरविलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल तेथे ती अतिरिक्त रक्कम, पोट-कलम (५) अन्वये व्याज असल्यास त्यासह, राज्य शासन, विहित रीतीने, भूमि संपादन अधिकाऱ्याकडे जमा करील आणि पोट-कलमे (२) ते (४) च्या तरतुदी अशा जमा रकमेला लागू होतील.

१९०८ चा ५. **१९ड.** या अधिनियमाच्या प्रयोजनासाटी भूमि संपादन अधिकाऱ्यास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये वादाची न्यायचौकशी करताना, दिवाणी न्यायालयास जे अधिकार असतात ते सर्व अधिकार पुढील बाबतीत असतील :— भूमि संपादन अधिकाऱ्यास दिवाणी न्यायालयाचे विवक्षित अधिकार असणे.

(अ) कुठल्याही व्यक्तीला उपस्थित राहण्यास फर्मावणे आणि हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे ;

(ब) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्मावणे ;

(क) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे ;

(ड) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून सार्वजनिक अभिलेख मागवणे ;

(ई) साक्षीदारांच्या तपासणीकरिता आयोगपत्र देणे.

१९८४ चा १. **१९ई.** भूमि संपादन अधिनियम, १८९४ मधील कोणतीही बाब या अधिनियमान्वये केलेल्या जमिनीच्या संपादनास लागू होणार नाही. १८९४ चा भूमि संपादन अधिनियम लागू न होणे.

प्रकरण चार

## महामार्गाचा अनधिकृत भोगवटा करण्यास किंवा त्यावर अतिक्रमण करण्यास प्रतिबंध व अतिक्रमण काढून टाकणे.

**२०.** महामार्गाचा भाग असलेल्या ज्या जमिनी राज्य सरकारकडे अगोदरच निहित नसतील त्या सर्व जमिनी या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी, राज्य सरकारची मालमत्ता आहे असे मानले जाईल. महामार्गाचा भाग असलेल्या जमिनी सरकारी मालमत्ता आहे असे मानणे.

**२१.** (१) कोणत्याही व्यक्तीने महामार्ग प्राधिकाऱ्याची किंवा महामार्ग प्राधिकाऱ्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची, लेखी परवानगी मिळविल्याशिवाय महामार्ग सीमांतील कोणत्याही महामार्गाचा भोगवटा करता कामा नये किंवा त्यावर अतिक्रमण करता कामा नये. महामार्गाचा अनधिकृत भोगवटा करण्यास प्रतिबंध.

(२) महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा महामार्ग प्राधिकाऱ्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, रहादारीची सुरक्षितता व सोय यांकडे योग्य लक्ष देऊन व राज्य सरकार लादील अशा शर्तीस व विहित करील अशा नियमांस अधीन राहून आणि अशा नियमांन्वये विहित करण्यात येईल असे भाडे व इतर आकार दिल्यावर कोणत्याही व्यक्तीला,—

(एक) त्याच्या मालकीच्या कोणत्याही इमारतीसमोर कोणत्याही महामार्गावर कोणतेही तात्पुरते अतिक्रमण करण्यास किंवा त्या महामार्गाच्या वर येणारे कोणतेही तात्पुरते बांधकाम करण्यास, किंवा

(दोन) कोणत्याही महामार्गावर कोणताही तात्पुरता शामियाना किंवा तंबू, मंडप किंवा इतर तत्सम उभारणी किंवा तात्पुरता गाळा किंवा परांची उभारण्यास, किंवा

(तीन) कोणत्याही महामार्गावर इमारती सामान, विक्रीसाठी असलेला माल किंवा इतर वस्तू ठेवण्यास किंवा ठेवविण्यास, किंवा

(चार) लगतच्या इमारतीत कोणतीही दुरुस्ती किंवा सुधारणा करण्यासाठी तात्पुरते उत्खनन करण्यास,

परवानगी देता येईल :

मात्र, महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने अशा कोणत्याही परवानगीचे स्पष्टपणे नवीकरण केल्याशिवाय अशी परवानगी एक वर्षाहून अधिक कालावधीसाठी कायदेशीर आहे असे मानले जाणार नाही.

(३) अशा रीतीने दिलेल्या परवानगीत, त्या महामार्गाचा भोगवटा करण्यास त्या व्यक्तीस ज्या तारखेपर्यंत प्राधिकृत केले आहे ती तारीख, ज्या प्रयोजनांसाठी भोगवटा करण्यास प्राधिकृत केले आहे ती प्रयोजने, व भोगवटा करण्याची परवानगी दिलेला महामार्गाचा नक्की भाग या गोष्टी स्पष्टपणे विनिर्दिष्ट केलेल्या असल्या पाहिजेत आणि आवश्यक असल्यास, त्यासोबत त्या महामार्गाच्या त्या भागाचा नकाशा किंवा रेखाचित्र देखील असले पाहिजे.

(४) ज्या व्यक्तीच्या नावे अशी परवानगी देण्यात आली असेल त्या व्यक्तीने, महामार्ग प्राधिकारी किंवा त्याबाबत सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे अधिकार प्रदान केलेला कोणताही अधिकारी जेव्हाजेव्हा तसे करण्यास फर्मावील तेव्हातेव्हा तो परवाना निरीक्षणासाठी सादर केला पाहिजे आणि त्या परवान्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या अखेरीस त्याच्या भोगवट्यात असलेली जमीन, त्याने भोगवटा करण्यापूर्वी ज्या स्थितीत होती त्या स्थितीत मोकळी करून दिली पाहिजे.

(५) महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा अशी परवानगी देणाऱ्या इतर अधिकाऱ्याने दिलेल्या अशा सर्व परवानगीची संपूर्ण नोंद ठेवली पाहिजे, आणि ती जमीन प्रत्यक्ष रिकामी करण्यात आली आहे याविषयी खात्री करून घेण्यासाठी ज्या कालावधीपर्यंत भोगवटा करण्यास प्राधिकृत केलेले आहे तो कालावधी संपल्यावर प्रत्येक बाबतीत तपासणी करण्याचीही व्यवस्था केली पाहिजे.

परवाना रद्द करण्याचा अधिकार.

**२२.** (१) महामार्ग प्राधिकाऱ्यास,—

(अ) कोणतेही भाडे किंवा आकार योग्य रितीने भरण्यात आले नसतील तर,

(ब) ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात आली होती ते प्रयोजन अस्तित्वात असण्याचे बंद झाले असेल तर,

(क) अशा परवानगीधारकाने अशा परवानगीचा किंवा अशा परवानगीच्या कोणत्याही अटींचा किंवा शर्तींचा भंग केला असेल तर,

(ड) ज्या जमिनीवर असे अतिक्रमण करण्यात आलेले असेल ती जमीन कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असेल किंवा अशा अतिक्रमणामुळे रहदारीत व्यत्यय येत असेल किंवा धोका उत्पन्न होत असेल तर,

कलम २१ अन्वये दिलेली कोणतीही परवानगी रद्द करता येईल.

(२) पोट-कलम (१), खंड (ब) किंवा (ड) अन्वये परवानगी रद्द करण्यात आली असेल तेव्हा, आगाऊ दिलेले कोणतेही भाडे किंवा आकार, राज्य सरकारला येणे असलेली कोणतीही रक्कम वजा करून, अशा परवानगीधारकास परत केले पाहिजेत.

**२३.** (१) जेव्हा महामार्गाच्या सीमांची तपासणी केल्यामुळे किंवा अन्यथा, महामार्गावर अतिक्रमण झाले आहे असे उघडकीस येईल तेव्हा, महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा कलम २१, पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने त्या अतिक्रमणाबद्दल जबाबदार असलेल्या व्यक्तींवर किंवा त्याच्या प्रतिनिधीवर एक नोटीस बजावून नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत असे अतिक्रमण काढून टाकण्यास व अतिक्रमणापूर्वी ती जमीन ज्या स्थितीत होती त्या स्थितीत पूर्ववत करण्यास सांगितले पाहिजे. अतिक्रमणास प्रतिबंध.

(२) अशा नोटिशीत अतिक्रमण झालेली जमीन व ज्या कालमर्यादेत असे अतिक्रमण काढून टाकण्यात येईल ती कालमर्यादा विनिर्दिष्ट केली पाहिजे आणि विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत आदेशाचे पालन करण्यास चुकल्यास, ती व्यक्ती खटला भरला जाण्यास व तडकाफडकी काढून टाकली जाण्यास पात्र होईल असेही तीत नमूद करण्यात आले पाहिजे.

(३) नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या आत, असे अतिक्रमण काढून टाकण्यात आले नाही व तसे न करण्याचे कोणतेही सबळ कारण दाखवण्यात आले नाही तर, महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यास अशा व्यक्तींवर तिने असे अतिक्रमण केल्याबद्दल किंवा करवल्याबद्दल व विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत ते काढून टाकण्यात चुकल्याबद्दल योग्य त्या दंडाधिकाऱ्यापुढे खटला भरता येईल.

(४) जेव्हा विक्रीसाठी वस्तू मांडण्याच्या, माल विकण्यासाठी तात्पुरत्या छपऱ्या उघडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा किरकोळ स्वरूपाच्या तत्सम इतर प्रयोजनासाठी असे अतिक्रमण करण्यात आले असेल तेव्हा, महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यास आवश्यक असल्यास, पोलिसांची मदत घेऊन पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे नोटीस न देता असे अतिक्रमण तडकाफडकी काढून टाकता येईल, किंवा अतिक्रमण काढून टाकण्याऐवजी, अतिक्रमणाबद्दल जबाबदार असलेल्या व्यक्तीने अतिक्रमण केलेल्या क्षेत्राबद्दल भाडे देऊन महामार्ग प्राधिकाऱ्याच्या नावाने भाडेपट्टा करून द्यावा असा तिला विकल्प देता येईल.

(५) जेव्हा अतिक्रमण तात्पुरत्या स्वरूपाचे असेल व ते सहज काढून टाकणे शक्य असेल परंतु पोट-कलम (४) च्या अर्थाप्रमाणे क्षुल्लक म्हणून ज्याचे वर्णन करता येईल अशा स्वरूपाचे ते नसेल तेव्हा, महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यास, अतिक्रमण केल्याबद्दल जबाबदार असलेल्या व्यक्तीवर पोट-कलम (३) अन्वये खटला भरून त्याशिवाय किंवा खटला भरण्याच्या ऐवजी आवश्यक असल्यास, पोलिसांची मदत घेऊन असे अतिक्रमण तडकाफडकी काढून टाकता येईल.

(६) जेव्हा महामार्गावरील रहदारीच्या सुरक्षिततेच्या किंवा महामार्गाचा भाग असलेल्या कोणत्याही बांधकामाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिक्रमण ताबडतोब काढून टाकणे आवश्यक आहे असे वाटत असेल तेव्हा, महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यास पोट-कलम (३) अन्वये त्या व्यक्तीवर खटला भरून त्याशिवाय, एकतर—

(एक) महामार्गावरील रहदारीस असलेला धोका कमी करण्यासाठी व्यवहार्य असेल असे संरक्षक काम वाजवी खर्चात पार पाडता येईल ; किंवा

(दोन) आवश्यक असल्यास, पोलिसांची मदत घेऊन असे अतिक्रमण काढून टाकता येईल.

कलम २३ पोट-कलम (१) अन्वये बजावलेल्या नोटिशीविरुद्ध अपील.

**२४.** ज्या व्यक्तीवर कलम २३, पोट-कलम (१) अन्वये अतिक्रमण काढून टाकण्याविषयी नोटीस बजावण्यात आली आहे ती व्यक्ती जेव्हा, ज्या जमिनीबाबत अतिक्रमण केले आहे असे अभिकथन केले आहे ती जमीन तिची मालमत्ता आहे किंवा प्रतिकूल कब्जाच्या आधारे किंवा अन्यथा तिने तिच्यावर अधिकार संपादन केला आहे असा दावा सांगेल तेव्हा तिने, अतिक्रमण काढून टाकण्यासाठी नोटिशीत विहीत केलेल्या कालमर्यादेच्या आत, यथास्थिती, महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा कलम २१, पोटकलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास कळवून जिल्हाधिकाऱ्याकडे अपील दाखल केले पाहिजे. जिल्हाधिकाऱ्याने रीतसर चौकशी केल्यानंतर आपला निर्णय लेखी अभिलिखित केला पाहिजे व तो अपीलकर्त्यास व महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास कळविला पाहिजे. महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा अशा अधिकाऱ्याने तोपर्यंत त्याबाबतीत पुढील कारवाई करण्याचे थांबवले पाहिजे.

अतिक्रमण काढून टाकण्याच्या खर्चाची वसुली.

**२५.** (१) जेव्हा जेव्हा महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा कलम २१, पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, कलम २३ च्या तरतुदींन्वये कोणतेही अतिक्रमण काढून टाकले असेल किंवा अशा अतिक्रमणाच्या संबंधात कोणतेही संरक्षक काम पार पाडले असेल तेव्हा तेव्हा त्यात अंतर्भूत असलेला खर्च, अतिक्रमणास जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने वसूल केला पाहिजे.

(२) महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने खर्च दर्शविणारे बिल अतिक्रमणास जबाबदार असलेल्या व्यक्तींवर किंवा तिच्या प्रतिनिधीवर बजावले पाहिजे व विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत बिलात उल्लेख केलेल्या प्राधिकाऱ्याकडे रक्कम भरण्याचा निदेश दिला पाहिजे.

(३) बिलात दर्शवलेली खर्चाची रक्कम ही आलेल्या खर्चाची रक्कम आहे अशा अर्थाचे महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र बिलासोबत असले पाहिजे आणि असे प्रमाणपत्र तो खर्च प्रत्यक्ष झाला याबद्दल निर्णायक पुरावा असेल.

(४) कोणतेही अतिक्रमण काढून टाकल्यावर काही सामान मिळाले असल्यास ते अतिक्रमाणास जबाबदार असलेल्या व्यक्तीने बिलाची रक्कम भरल्यावर तिच्या हवाली केले पाहिजे, परंतु विनिर्दिष्ट कालावधीत रक्कम भरण्यात ती चुकली तर, त्या सामानाचा लिलाव करता येईल आणि लिलाव करून आलेल्या रकमेतून बिलाची रक्कम वजा करून काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती रक्कम अशा व्यक्तीस देण्यात येईल.

(५) लिलावाने विक्री करून आलेली रक्कम बिलाची एकूण रक्कम भागवण्यास पुरेशी नसेल तर, सामानाची विक्री करून आलेल्या रकमेपेक्षा बिलाची एकूण रक्कम जितक्या रकमेने अधिक असेल ती रक्कम किंवा विक्री करता येईल असे कोणतेही सामान नसेल आणि अतिक्रमणास जबाबदार असलेल्या व्यक्तीने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत बिलाची रक्कम भरली नाही तर, बिलाची संपूर्ण रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून अशा व्यक्तीकडून वसूल केली जाईल.

## प्रकरण पाच

## भरपाई

**२६.** महामार्ग प्राधिकारी किंवा कलम ६ अन्वये नियुक्त केलेला कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी, किंवा राज्य सरकारने या अधिनियमान्वये किंवा तदनुसार प्राधिकृत केलेली इतर कोणतीही व्यक्ती, पुढील तरतुदींखालील अधिकारांचा वापर करताना शक्य तितके कमी नुकसान पोचवील आणि या अधिनियमांन्वये किंवा तदनुसार विहित केलेल्या रीतीने पुढील अधिकारांचा वापर करताना नुकसान पोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस भरपाई दिली जाईल :— विवक्षित बाबतीत कमीतकमी नुकसान होऊ देणे आणि भरपाई.

(अ) कलम ९ अन्वये निर्बंध घालणे;

(ब) कलम १२ अन्वये कोणतीही इमारत किंवा तिचा भाग मागे हटवणे;

(क) कलम १३ अन्वये महामार्गाकडे जाण्या-येण्याच्या कोणत्याही हक्काचे नियमन करणे किंवा तो वळवणे;

(ड) कलम १४ अन्वये कोणत्याही जमिनीवर प्रवेश करणे, तिचे सर्वेक्षण करणे, तिचे मोजमाप घेणे आणि त्याअन्वये कोणतेही कृत्य करणे;

[१] * * * * * * *

(फ) कलम ५२ अन्वये कोणताही महामार्ग किंवा त्याचा भाग बंद करणे.

**२७.** कलम २६ अन्वये देय भरपाईची रक्कम, ज्या व्यक्तींना ती द्यावयाची त्या व्यक्ती आणि त्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तींमध्ये तिचे संविभाजन या गोष्टी, महामार्ग प्राधिकारी राज्य सरकारने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी आणि त्यात हितसंबंध असल्याचा दावा सांगणारी किंवा सांगणारी किंवा सागणाऱ्या व्यक्ती यांच्यामधील कराराने ठरविल्या पाहिजेत. भरपाईची रक्कम कराराने ठरवणे.

**२८.** (१) कलम २७ अन्वये कोणताही करार न केल्यास, महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा राज्य सरकारने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन, चौकशी केल्यावर,- करार न केल्यास भरपाईची रक्कम ठरवणे.

[२] * * * * * * *

(ब) कलम २६ अन्वये द्यावयाच्या भरपाईची रक्कम,

(क) अशी भरपाई मिळण्याचा हक्क ज्यांना आहे असे माहित असेल किंवा वाटत असेल अशा सर्व व्यक्तींमध्ये अशा भरपाईचे संविभाजन करावयाचे असल्यास, ते संविभाजन,

ठरवणारा निवाडा दिला पाहिजे :

[३][ मात्र, राज्य सरकार सामान्य आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा रकमेपेक्षा अधिक रक्कम भरपाई म्हणून द्यावयास सांगणारा निवाडा, राज्य सरकारच्या किंवा याबाबतीत राज्य सरकार नियुक्त नेमित अशा अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय दिला जाता कामा नये.

[४] * * * * * * *

---

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ३ अन्वये खंड (ई) वगळण्यात आला.

२. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ४ (अ) अन्वये खंड (अ) वगळण्यात आला.

३. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ७ अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

४. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७, कलम ४(ब) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आला.

इतर कोणत्याही कायद्याअन्वये तत्सम निर्बंध अंमलात असतील किंवा भरपाई आधीच मिळाली असेल तर, भरपाई न मिळणे.

**२९.** (एक) जर आणि जितपत ती जमीन या अधिनियमान्वये ज्या तारखेस निर्बंध लादण्यात आले त्या तारखेस अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये अंमलात असलेल्या बहुतांशी तशाच निर्बंधांच्या अधीन असेल तर आणि तितपत;

(दोन) जर त्या जमिनीच्या संबंधात, या अधिनियमान्वये लादलेल्या त्याच निर्बंधांच्या किंवा कोणत्याही इतर कायद्यान्वये अंमलात असलेल्या बहुतांशी तशाच निर्बंधांच्या संबंधातील भरपाई, दावा सांगणाऱ्या व्यक्तीला, किंवा दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या पूर्वहिताधिकाऱ्यास आधीच देण्यात आली असेल तर,

कोणतीही भरपाई दिली जाणार नाही.

इमारत बांधण्याची परवानगी नाकारल्याबद्दल द्यावयाच्या भरपाईची रक्कम परवानगी नाकारण्यात आली त्यावेळेचे तिचे मूल्य व ती देण्यात आली असती त्या वेळचे तिचे मूल्य यांमधील फरकापेक्षा अधिक नसणे.

**३०.** जेव्हा कोणतीही इमारत उभारण्यासाठी कलम ९ किंवा १० अन्वये परवानगी नाकारण्यात आली असेल तेव्हा भरपाईची रक्कम [१] * * * [२][ कलम १९ब ] ठरविल्याप्रमाणे त्या जमिनीचे मूल्य व परवानगी देण्यात आली असती तर तिचे जे मूल्य झाले असते ते मूल्य यांच्यामधील फरकापेक्षा अधिक असता कामा नये. असे मूल्य ठरवतांना भरपाईचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीचा त्या जमिनीवर इमारत उभारणे किंवा अन्यथा तिचा उपयोग करणे, ती धारण करणे किंवा तिचा विनियोग करणे यासंबंधीच्या हक्काच्या बाबतीत त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याअन्वये ती जमीन ज्या कोणत्याही निर्बंधाच्या अधीन असेल, ते निर्बंध विचारात घेतले जातील.

१८९४ चा १.

जाण्या-येण्याचा मार्ग वळवल्याबद्दलची भरपाई पर्यायी मार्गाच्या खर्चापेक्षा अधिक नसणे.

**३१.** जेव्हा महामार्गावरील जाण्या-येण्याचा हक्क वळवल्यामुळे किंवा बंद केल्यामुळे तो हक्क नष्ट झाला असेल व जाण्यायेण्याचा पर्यायी मार्ग दिला असेल तेव्हा, भरपाईची रक्कम, कोणत्याही बाबतीत, दावा सांगणाऱ्याच्या मालमत्तेपासून अशा पर्यायी मार्गापर्यंत जाण्या-येण्याचा नवीन मार्ग तयार करण्यास येणाऱ्या खर्चाच्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.

उभी पिके, झाडे वगैरे तोडल्याबद्दल भरपाई.

**३२.** (१) कलम १४ अन्वये जमिनीवर प्रवेश करताना, तिचे सर्वेक्षण करताना किंवा मोजमाप घेताना किंवा इतर कोणतीही गोष्ट करताना, प्रवेश करणाऱ्या, सर्वेक्षण करणाऱ्या किंवा मोजमाप घेणाऱ्या किंवा इतर कोणतीही गोष्ट करणाऱ्या अधिकाऱ्याने असा कोणताही प्रवेश, सर्वेक्षण, मोजमाप किंवा काम करणे आणि त्या जमिनीवरील उभी पिके, झाडे तोडणे, किंवा काही तात्पुरती बांधकामे, असल्यास ती काढून टाकणे, यामुळे झालेल्या सर्व आवश्यक हानीबद्दल भरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीला भरपाई दिली पाहिजे किंवा देऊ केली पाहिजे. अशा रीतीने दिलेली किंवा देऊ केलेली रक्कम पुरेशी असल्याबद्दल कोणताही विवाद निर्माण झाला तर, संबंधित अधिकाऱ्याने तो विवाद ताबडतोब महामार्ग प्राधिकाऱ्याकडे पाठवला पाहिजे व त्या प्राधिकाऱ्याने, व्यवहार्य असेल तितका कमी विलंब लावून त्या विवादाचा निर्णय केला पाहिजे आणि हक्क असलेल्या व्यक्तीस भरपाई म्हणून ठरवलेली रक्कम दिली पाहिजे. महामार्ग प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

---

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ३ अन्वये "सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे" हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) कलम १९ अन्वये जमिनीचा कब्जा घेण्याच्या वेळी त्या जमिनीवर कोणतीही उभी पिके, झाडे किंवा तात्पुरती बांधकामे असतील तर, महामार्ग प्राधिकाऱ्याने, हक्क असलेल्या व्यक्तीस अशी उभी पिके, झाडे किंवा तात्पुरती बांधकामे याबद्दल भरपाईची रक्कम दिली किंवा देऊ केली पाहिजे. जर अशी रक्कम पुरेशी असल्याबद्दल विवाद निर्माण झाला तर, [1][ कलम १९ब ] अन्वये जमिनीसाठी भरपाई ठरवताना अशा पिकांचे, झाडांचे व तात्पुरत्या बांधकामाचे मूल्य विचारात घेतले पाहिजे.

**३३.** महामार्गाच्या प्रयोजनासाठी संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीवर कोणत्याही व्यक्तीने अनधिकृतपणे कोणतीही इमारत उभारली असेल, पुन्हा उभारली असेल, तीत वाढ केली असेल, किंवा फेरफार केला असेल तर, असे उभारणे, पुन्हा उभारणे, वाढ करणे किंवा फेरफार करणे यामुळे जमिनीच्या मूल्यात होणारी कोणतीही वाढ, जमिनीचे मूल्य ठरवताना विचारात घेतली जाणार नाही. अनधिकृत उभारणी बद्दल भरपाई न मिळणे.

**३४.** कोणतेही अतिक्रमण काढून टाकण्याबद्दल कोणतीही भरपाई देय असणार नाही. अतिक्रमण काढून टाकण्याबद्दल भरपाई न मिळणे.

**३५.** [2][ (१) महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा कलम २८ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या निवाड्याने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला महामार्ग प्राधिकाऱ्याकडे किंवा अशा अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून, कलम १९-ब, च्या पोटकलम (८) अन्वये नियुक्त केलेल्या लवादाकडे ती बाब पाठवण्यास सांगता येईल.] महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा कलम २८ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या निवाड्याविरुद्ध निर्देश लिहून पाठवणे.

(२) असा कोणताही अर्ज निवाड्याच्या तारखेपासून सहा आठवड्याच्या आत केला पाहिजे व तो विहीत करण्यात येईल अशा नमुन्यात असला पाहिजे.

१९०८ चा ९. [3][ * * *]

(४) महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याने विहित करण्यात येईल अशा रीतीने असा निर्देश पाठवला पाहिजे.

१९०८ चा ५. **३६.** (१) कलमे ३५ व ४४ खालील निर्देश, हे, दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ कलम १४१ च्या अर्थानुसार कार्यवाही आहे असे मानले जाईल, आणि त्यांची न्यायचौकशी करताना अशा निर्देशांचा निर्णय करण्याचा अधिकार प्रदान केलेल्या प्राधिकाऱ्यांना त्या संहितेअन्वये दिवाणी न्यायालयास असलेल्या सर्व अधिकारांचा वापर करता येईल. कलमे ३५ व ४४ अन्वये पाठवलेल्या निर्देशांचा निर्णय करण्याचा अधिकार प्रदान केलेल्या प्राधिकाऱ्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि त्यांचे अधिकार.

(२) कलमे ३५ किंवा ४४ अन्वये निर्देशांच्या बाबतीत करावयाच्या चौकशीची व्याप्ती ही, या अधिनियमांच्या तरतुदीनुसार, पोटकलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या प्राधिकाऱ्याकडे पाठवलेल्या बाबी विचारात घेण्यापुरतीच मर्यादित असेल.

---

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ६ अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ७ (अ) अन्वये हे पोट-कलम बदली दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) अन्वये हे पोट-कलम वगळण्यात आले.

कोणतेही अतिक्रमण स्वाधीन करण्यास किंवा काढून टाकण्यास पोलीस आयुक्ताने किंवा जिल्हा पोलीस अधिक्षकाने भाग पाडणे.

**३७.** या अधिनियमान्वये [1][ * * *] कोणतेही काम पार पाडताना किंवा कोणतेही अतिक्रमण काढून टाकताना महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास विरोध किंवा अडथळा केल्यास, संबंधित महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने, बृहन्मुंबईत पोलीस आयुक्तांकडे व इतरत्र जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे किंवा राज्य सरकार याबाबत अधिकार प्रदान करील अशा पोलीस अधिकाऱ्याकडे अर्ज केला पाहिजे, आणि तो आयुक्त, जिल्हा अधीक्षक किंवा अशा रीतीने अधिकार प्रदान केलेला अधिकारी, यथास्थिती, जमीन स्वाधीन करण्यास, अतिक्रमण काढून टाकण्यास किंवा काम पार पाडण्यास भाग पाडील.

कलमे ३५ व ४४ अन्वये प्राधिकाऱ्यांचे निर्णय, दिवाणी न्यायालयाचे हुकूमनामे असल्याप्रमाणे अंमलात आणणे.

**३८.** कलमे ३५ व ४४ अन्वये पाठवलेल्या निर्देशावर निर्णय देण्याचा अधिकार प्रदान केलेल्या प्राधिकाऱ्यांचे निर्णय, दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा असल्याप्रमाणे अंमलात आणले पाहिजेत.

निवाड्यात ठरवलेली भरपाई देणे.

**३९.** (१) कलम २७ अन्वये करारात भरपाई ठरवल्यावर, किंवा

(२) कलम २८ अन्वये निवाडा दिल्यावर, किंवा

(३) कलम ३५ अन्वये अशा निवाड्याविरुद्ध निर्देश पाठवला असेल तर, त्या कलमान्वये प्राधिकाऱ्याच्या निर्णयानंतर,

महामार्ग प्राधिकाऱ्याने, भरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीस दिलेली भरपाईची रक्कम, यथास्थिती, करारानुसार किंवा त्याच्या निवाड्यानुसार किंवा कलम ३५ अन्वये पाठवलेल्या निर्देशावर निर्णय देण्याचा अधिकार प्रदान केलेल्या प्राधिकाऱ्याच्या निर्णयानुसार दिली पाहिजे. [2][कलम १९-अ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, अशी भरपाई देण्यास लागू होतील.]

समायोजनाने भरपाई देणे.

**४०.** या अधिनियमान्वये महामार्ग प्राधिकाऱ्याने भरपाई म्हणून कोणत्याही व्यक्तीला देणे असलेल्या सर्व रकमा शक्य असेल तितपत, प्रकरण ६ अन्वये अशा व्यक्तीकडून येणे असलेले सुधार आकार, काही असल्यास, त्यासंबंधी अशा व्यक्तींच्या लेख्यात समायोजन करून दिल्या पाहिजेत.

## प्रकरण सहा

## **सुधार आकार बसवणे**

मालक व हितसंबंधित व्यक्ती यांना नोटीस.

**४१.** महामार्ग प्राधिकाऱ्यास, या अधिनियमांच्या तरतुदीन्वये किंवा तदनुसार हाती घेण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेले कोणतेही काम हाती घेण्यात येईल तेव्हा राज्य सरकारने याबाबत प्राधिकृत केलेला अधिकारी, अशा कामांमुळे फायदा झालेल्या जमिनींचे मालक किंवा जमिनीत हितसंबंध असणाऱ्या म्हणून माहित असलेल्या किंवा समजण्यात येणाऱ्या व्यक्तींना

---

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ८ अन्वये "कोणत्याही जमिनीचा कब्जा घेताना किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

नोटीस देऊन त्यांना, अशा जमिनींवर सुधार आकार बसविण्यासंबंधी व तो वसूल करण्यासंबंधी त्यांचे काही आक्षेप, असल्यास, ते नमूद करण्यासाठी तीत उल्लेख केलेल्या वेळी व ठिकाणी (अशी वेळ नोटिशीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आतील असता कामा नये) एकतर जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत त्याच्यासमोर हजर राहण्यास सांगेल :

मात्र, असे बांधकाम केल्यामुळे अशा जमिनींचे मूल्य वाढण्याचा संभव आहे किंवा वाढलेले आहे असे जिल्हाधिकाऱ्याने, राज्य सरकारची पूर्वमंजुरी घेऊन जाहीर केल्याशिवाय अशी कोणतीही नोटीस देता येणार नाही.

**४२.** कलम ४१ अन्वये ठरवलेल्या तारखेस किंवा ज्या तारखेपर्यंत चौकशी स्थगित करण्यात येईल अशा इतर तारखेस, कलम ४१ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, रीतसर चौकशी करून आणि कलम ४१ खालील नोटीशी अन्वये आवश्यक असलेल्या व्यक्तींनी नमूद केलेले काही आक्षेप असल्यास ते ऐकून घेतल्यानंतर आदेश दिला पाहिजे. अशा आदेशात पुढील गोष्टी विनिर्दिष्ट केल्या पाहिजेत,— चौकशी व आदेश.

(अ) बांधकाम केल्यामुळे ज्या जमिनीचा फायदा झाला त्या जमिनी,

(ब) नियोजित बांधकामामुळे अशा जमिनींच्या मूल्यात झालेली वाढ.

(क) उक्त जमिनींपैकी प्रत्येकीवर बसवावयाच्या सुधार आकाराची रक्कम.

(ड) ज्या तारखेपासून असे सुधार आकार बसवण्याजोगे असतील ती तारीख :

मात्र, जी कोणतीही जमीन—

(अ) इमारतीची जागा म्हणून विकास करण्यासाठी अयोग्य असेल, किंवा

(ब) दोन्ही बाजूला महामार्गाच्या मध्यभागापासून एका फर्लांगाच्या अंतराबाहेर असेल, त्या जमिनीच्या संबंधात कोणताही सुधार आकार बसवण्याजोगा असणार नाही.

**४३.** असे बांधकाम केल्यामुळे मूल्यात होणाऱ्या वाढीची रक्कम ही, नियोजित काम पूर्ण झाल्याच्या तारखेस असलेले जमिनीचे मूल्य, त्या कामास प्रारंभ केल्याच्या तारखेस असलेल्या मूल्यापेक्षा जितक्या रकमेने वाढण्याचा संभव असेल किंवा वाढले असेल त्या रकमेइतकी असेल, आणि सुधार आकार हा अशा मूल्यातील वाढीच्या निम्म्याइतका असेल. मुल्यातील वाढ व सुधार आकार.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, राज्य सरकारने, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे—

(अ) कोणत्याही बांधकामास प्रारंभ करण्याची तारीख,

(ब) असे काम पूर्ण करण्याची तारीख,

विनिर्दिष्ट केली पाहिजे.

**४४.** (१) सुधार आकार निश्चित करणाऱ्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, कलम ४१ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून, ज्या जमिनीच्या संबंधात तो आदेश देण्यात आला असेल ती जमीन— प्राधिकृत अधिकाऱ्याच्या कलम ४२ खालील आदेशाविरुद्ध निर्देश.

(एक) बृहन्मुंबईत असेल तर, नगर दिवाणी न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीशाकडे किंवा प्रमुख न्यायाधीशांशी विचारविनिमय करून राज्य सरकार नामनिर्देशित करील अशा त्या न्यायालयाच्या इतर न्यायाधीशाकडे; आणि

(दोन) इतरत्र असेल तर, अशी जमीन ज्याच्या अधिकारितेच्या सीमेत असेल त्या जिल्ह्याचा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्याकडे;

अशी बाब पाठवण्यास सांगता येईल.

(२) असा कोणताही अर्ज, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याचा आदेश अशा व्यक्तीस ज्या तारखेस कळवण्यात आला होता त्या तारखेपासून सहा आठवड्यांच्या आत केला पाहिजे व तो विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असला पाहिजे.

(३) भारतीय मुदत अधिनियम, १९०८, कलमे ५, १२ व १४ यांच्या तरतुदी पोट-कलम (२) अन्वये निर्देश पाठवण्यासाठी ठरवलेल्या मुदतीची संगणना करण्यास लागू होतील. १९०८ चा ९.

(४) कलम ४१ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, विहित करण्यात येईल अशा रीतीने असा निदेश पाठवला पाहिजे.

सुधार आकार निश्चित करणारा आदेश व निर्देशावरील निर्णय अंतिम असणे.

**४५.** कलम ४४ अन्वये प्राधिकाऱ्याकडे निर्देश पाठवण्यास अधीन राहून, कलम ४२ अन्वये दिलेला, सुधार आकार निश्चित करणारा आदेश व कलम ४४ अन्वये निर्देशावरील त्या प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

सुधार आकार हा, जमिनीवर जमीन महसुलानंतरचा पहिला बोजा असणे.

**४६.** सुधार आकार निश्चित करणाऱ्या आदेशात, ज्या तारखेपासून सुधार आकार बसवण्याजोगा असेल ती तारीख म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून किंवा कलम ४४ अन्वये तो प्राधिकारी अन्यथा ज्या तारखेपासून असा आकार बसवण्याजोगा असेल ती तारीख म्हणून विनिर्दिष्ट करील त्या तारखेपासून कोणत्याही जमिनीच्या संबंधात वसूल करण्याजोगा असा आकार, त्या जमिनीबद्दल राज्य सरकारला येणे असलेला काही जमीन महसूल, असल्यास, तो आधी भरण्यास अधीन राहून, त्या जमिनीच्या संबंधात असा सुधार आकार बसवण्याजोगा असेल त्या जमिनीवरील पहिला बोजा असेल.

सुधार आकार भरणे.

**४७.** कलम ७१ अन्वये राज्य सरकारने केलेल्या नियमांन्वये ठरविलेल्या तारखेस सुधार आकार भरण्याजोगा असेल :

मात्र, ज्या जमिनीवर असा आकार बसवण्यात आला असेल त्या जमिनीच्या मालकास, अशा आकाराची रक्कम, विहीत करण्यात येईल अशा दराने होणाऱ्या त्यावरील व्याजासह व विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या आत वार्षिक हप्त्यांनी भरण्याचे मान्य करणारा करार राज्य सरकारच्या नावे करून देता येईल.

सुधार आकार भरण्याच्या ऐवजी जमीन सोडून देणे किंवा तिची अदलाबदल करणे.

**४८.** कलम ४७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य सरकार ज्या जमिनीवर सुधार आकार देय असेल त्या जमिनीच्या मालकास, असा आकार देण्याऐवजी, ती सबंध जमीन किंवा तिचा कोणताही भाग विहीत करण्यात येतील अशा शर्तीवर सोडून देण्याची किंवा अदलाबदल करून ती जमीन राज्य सरकारच्या नावे स्वाधीन करण्याची मुभा देऊ शकेल :

मात्र, अशी जमीन भारमुक्त असल्याशिवाय अशाप्रकारे कोणतीही जमीन सोडून देण्याची किंवा तिची अदलाबदल करण्याची परवानगी देता येणार नाही.

## प्रकरण सात

## रहदारीची सुरक्षितता व महामार्गाचे नुकसान होण्यास प्रतिबंध यासंबंधी पूरक तरतुदी

**४९.** (१) कोणताही महामार्ग वापरणाऱ्या व्यक्तींना पुढचे दिसणार नाही अशा रीतीने [१][ किंवा अशा व्यक्तींचे चित्त विचलित केल्यामुळे ] व विशेषतः अशा महामार्गाच्या वळणावर किंवा कोपऱ्यावर केलेल्या अडथळ्यामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यास प्रतिबंध करणे आवश्यक आहे असे जेव्हा महामार्ग प्राधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, त्यास, कलम ११ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, अशा महामार्गाच्या बाजुच्या किंवा वळणाच्या किंवा कोपऱ्याच्या बाजुच्या जमिनीच्या मालकावर किंवा तिचा भोगवटा करणाऱ्यावर नोटीस बजावून अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने अस्तित्वात असलेली कोणतीही भिंत, (कायम बांधकामाचा भाग असलेली भिंत सोडून) कुंपण, वई, झाड, जाहिरातीचा खांब, जाहिरात फलक किंवा त्यावरील कोणतीही इतर वस्तू यांची ऊंची किंवा स्वरूप नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही आवश्यक गोष्टीनुसार होईल अशा रीतीने बदलण्यास त्यास सांगता येईल.

[२] [कोणताही महामार्ग वापरणाऱ्या व्यक्तींना पुढचे दिसणार नाही अशी रीतीने अडथळा झाल्याने निर्माण होणाऱ्या धोक्यांना प्रतिबंध]

(२) पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्यात आलेली कोणतीही व्यक्ती अशा नोटिशीतील कोणत्याही आवश्यक गोष्टींचे अनुपालन करण्यास आक्षेप घेईल तर, तिला नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, आपला आक्षेप त्याच्या कारणांसह महामार्ग प्राधिकाऱ्याकडे लेखी पाठवता येई.

(३) महामार्ग प्राधिकाऱ्याने असा आक्षेप मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, प्रतिपादन केलेल्या कारणांचा विचार केला पाहिजे आणि लेखी आदेशाद्वारे, ती नोटीस मागे घेतली पाहिजे, दुरुस्त केली पाहिजे किंवा कायम केली पाहिजे.

(४) पोट-कलम (३) अन्वये महामार्ग प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाने जर एखादी व्यक्ती व्यथित झाली असेल तर तिला, ज्या तारखेस तिला असा आदेश कळवण्यात आला असेल त्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, जिल्हाधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल व या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल.

(५) जर एखादी व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये तिच्यावर बजावण्यात आलेल्या व यथास्थिती, पोट-कलम (३) अन्वये दुरुस्त केलेल्या किंवा कायम केलेल्या नोटिशीचे अनुपालन करण्यास चुकेल तर, महामार्ग प्राधिकाऱ्यास, जिच्यायोगे पुढचे दिसण्यात अडथळा येतो [३][ किंवा चित्त विचलित होते ] अशा वस्तूमध्ये स्वतःच्या खर्चाने फेरफार करण्याची कार्यवाही करता येईल आणि त्या व्यक्तीविरुद्ध करता येईल अशा कोणत्याही अन्य कार्यवाहीस बाध न येता, असा खर्च कलम २५ च्या तरतुदींनुसार अशा व्यक्तीकडून वसून केला जाईल.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ८(अ) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८(क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ८(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

जेव्हा महामार्ग असुरक्षित असल्याचे जाहीर करण्यात आले असेल तेव्हा महामार्ग प्राधिकाऱ्याने रहदारीचे नियमन करणे.

**५०.** जर महामार्ग प्राधिकाऱ्यास, त्याच्या ताब्यात असलेला महामार्ग किंवा त्याचा कोणताही भाग, खराब झाल्यामुळे किंवा अन्यथा वाहनाच्या किंवा पादचाऱ्यांच्या रहदारीसाठी असुरक्षित आहे किंवा असुरक्षित झालेला आहे असे केव्हाही दिसून आले तर, त्यास याबाबत विहित करण्यात येतील अशा नियमांच्या अधीन, तो महामार्ग किंवा त्याचा भाग सर्व रहदारीसाठी किंवा रहदारीच्या कोणत्याही वर्गासाठी बंद करता येईल किंवा त्या महामार्गाचा उपयोग करणाऱ्या वाहनांची संख्या व वेग किंवा वजन यांचे नियमन करता येतील.

विवक्षित महामार्ग अवजड वाहनांचा उपयोग करण्यास मनाई.

**५१.** जेव्हा कोणताही महामार्ग किंवा त्याचा भाग किंवा कोणत्याही महामार्गावर किंवा महामार्गावरून बांधलेला कोणताही पूल, नाला किंवा सेतुमार्ग, ज्यांचे ओझे लादल्यानंतरचे वजन याबाबत ठरवण्यात येईल अशा मर्यादेपेक्षा अधिक असेल अशी वाहने चालवण्यासाठी बनवलेला नाही अशी महामार्ग प्राधिकाऱ्यांची खात्री झाली तर, त्यास, त्याबाबत विहित करण्यात येतील अशा नियमांच्या अधीन, अशा महामार्गावर किंवा महामार्गाच्या भागावर किंवा अशा पुलावर, नाल्यावर किंवा सेतुमार्गावर किंवा त्यावरून अशी वाहने चालवण्यास मनाई करता येईल किंवा चालवण्यावर निर्बंध घालता येतील.

जेव्हा महामार्ग प्राधिकाऱ्यास कोणताही महामार्ग कायमचा बंद करावयाचा असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

**५२.** (१) कलम ५० अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कोणताही महामार्ग किंवा त्याचा भाग कायमचा बंद करण्याची महामार्ग प्राधिकाऱ्यांची इच्छा असल्यास, त्याने तसे करण्याचा आपला उद्देश असल्याची नोटीस **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केली पाहिजे, तसेच अशी अधिसूचना निदान दोन वर्तमानपत्रात तरी प्रसिद्ध केली पाहिजे, त्यापैकी एक, महामार्ग ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणच्या प्रादेशिक भाषेतील असली पाहिजे.

(२) अशा नोटिशीत, तरतूद करावयाचे योजलेला किंवा अगोदरच अस्तित्वात असलेला कोणताही वैकल्पिक मार्ग असल्यास तो निर्दिष्ट करण्यात येईल आणि या प्रस्तावास कोणतेही आक्षेप असल्यास ते विनिर्दिष्ट मुदतीत सादर करण्याची विनंती करण्यात येईल.

(३) विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत कोणतेही आक्षेप आले असल्यास त्यांचा विचार केल्यावर, महामार्ग प्राधिकाऱ्याने कोणताही महामार्ग किंवा त्याचा भाग बंद करण्याबाबतच्या आपल्या प्रस्तावास अंतिम स्वरूप दिले पाहिजे आणि अशा प्रस्तावाविरुद्ध आलेल्या आक्षेपांसह अंतिम प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठविला पाहिजे.

(४) राज्य सरकार, फेरबदल करून किंवा कोणताही फेरबदल न करता तो प्रस्ताव मान्य करू शकेल किंवा नाकारू शकेल.

(५) राज्य सरकारने प्रस्तावास मान्यता दिली असेल तेव्हा त्याने आपले आदेश **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केले पाहीजेत.

(६) राज्य सरकारचे आदेश **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाले असतील तेव्हा, महामार्ग प्राधिकाऱ्याने त्या आदेशांना निदान दोन वर्तमानपत्रात आणखी प्रसिद्धि दिली पाहिजे, त्यांपैकी एक, असा महामार्ग ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणच्या प्रादेशिक भाषेतील असले पाहिजे आणि त्यानंतर तो महामार्ग किंवा त्याचा भाग बंद केला जाईल.

(७) जेव्हा कोणताही महामार्ग किंवा त्याचा कोणताही भाग अशा रीतीने बंद करण्यात आला

असेल तेव्हा, ज्या व्यक्तीस केवळ सर्वसामान्य जनतेपैकी एक व्यक्ती या नात्याने असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा अशा महामार्गाचा किंवा त्याच्या भागाचा आपल्या मालमत्तेकडे जाण्यायेण्याचा मार्ग म्हणून उपयोग करण्याचा हक्क होता व महामार्ग अशा रीतीने बंद केल्यामुळे जिचे नुकसान झाले असेल अशा प्रत्येक व्यक्तीला वाजवी भरपाई दिली जाईल.

महामार्गावर विवक्षित कृत्ये करण्यास महामार्ग प्राधिकाऱ्याची संमती घेणे आवश्यक असणे.

**५३.** (१) त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलम ७२ च्या तरतुदींच्या अधीन, महामार्ग प्राधिकाऱ्याखेरीज किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीने, महामार्ग प्राधिकाऱ्याची लेखी परवानगी असल्याशिवाय, कोणत्याही महामार्गाच्या मधून, पलीकडे, खाली किंवा वर कोणतीही वीजतार, तार, नळ, निःसारण, मलप्रणाल किंवा कोणत्याही प्रकारचा कालवा बांधता किंवा नेता कामा नये.

(२) महामार्ग प्राधिकाऱ्यास, आपली संमती देताना, त्यास आवश्यक वाटतील अशा शर्ती लादता येतील, तसेच नियोजित कामाने व्यापलेल्या किंवा त्यासाठी वापरलेल्या महामार्गाचा भाग असलेल्या कोणत्याही जमिनीबद्दल भाडे किंवा इतर आकार देखील बसवता येतील.

(३) कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) चे उल्लंघन करून कोणतेही बांधकाम करील किंवा पार पाडील तर, महामार्ग प्राधिकाऱ्यास कलम २३ च्या तरतुदींना अनुसरून असे बांधकाम हे महामार्गावरील अतिक्रमण आहे असे समजून ते काढून टाकता येईल व महामार्ग पूर्ववत करण्याची व्यवस्था करता येईल, आणि या प्रयोजनासाठी महामार्ग प्राधिकाऱ्यास जो खर्च येईल तो, अशा व्यक्तीविरुद्ध करता येईल अशा अन्य कोणत्याही कार्यवाहीस बाध न येता, कलम २५ मध्ये तरतूद केलेली कार्यपद्धती जितपत लागू असेल तितपत त्या कार्यपद्धतीस अनुसरून तिच्याकडून वसूल केला जाईल.

महामार्गाचे नुकसान करण्यास प्रतिबंध करणे व नुकसान झालेल्या महामार्गांची दुरुस्ती करणे.

**५४.** (१) कोणत्याही व्यक्तीने बुद्धिपुरस्सर कोणत्याही महामार्गाचे नुकसान करता कामा नये किंवा आपल्या ताब्यातील कोणत्याही वाहनास किंवा जनावरास तसे करू देता कामा नये.

(२) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून कोणत्याही महामार्गाचे कोणतेही नुकसान करण्यात आले असेल तेव्हा, महामार्ग प्राधिकाऱ्याने त्या नुकसानीची दुरुस्ती करून दिली पाहिजे व त्यासाठी आलेला खर्च, पोट-कलम (१) च्या उल्लंघनाबद्दल जबाबदार असलेल्या व्यक्तीविरुद्ध करता येईल अशा अन्य कोणत्याही कार्यवाहीस बाध न येता, कलम २५ मध्ये तरतूद केलेली कार्यपद्धती लागू असेल तितपत त्या कार्यपद्धतीनुसार तिच्याकडून वसूल करण्यात येईल.

## प्रकरण आठ

## **शास्ती**

आदेशांची किंवा सूचनांची अवज्ञा करणे व माहिती वगैरे देण्याचे नाकारणे.

**५५.** जो कोणी, या अधिनियमान्वये निदेश देण्याचा अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकाऱ्याने कायदेशीररीत्या दिलेल्या कोणत्याही निदेशाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा करील, किंवा या अधिनियमान्वये काम पार पाडण्याचा अधिकार प्रदान केलेल्या किंवा काम पार पाडणे आवश्यक असणाऱ्या व्यक्तीच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही कामात अडथळा आणील, किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जी माहिती पुरवणे आवश्यक आहे अशी माहिती रोखून ठेवील किंवा जी माहिती खोटी आहे हे माहित आहे किंवा जी खरी आहे असे त्यास वाटत नाही अशी माहिती देईल, त्याला सिद्धापराध ठरवण्यात आल्यावर [१] [ एक हजार रुपयांपर्यंत ] दंडाची शिक्षा होईल.

---

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम १० अन्वये "दोनशे रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

जाण्या-येण्याच्या मार्गासंबंधीच्या किंवा कोणतीही इमारत वगैरे उभारण्यासंबंधीच्या निर्बंधाचे उल्लंघन.

**५६.** जो कोणी कलम ९ च्या तरतुदीचे उल्लंघन करून कोणतीही इमारत उभारली, तीत फेरफार किंवा वाढ करील, किंवा कोणतेही उल्लंघन करील, किंवा महामार्गाकडे जाण्या-येण्याचा कोणताही मार्ग बांधील किंवा इतर कोणतेही काम करील त्यास, सिद्धापराध ठरवण्यात आल्यावर,—

(अ) [१][दोन हजार रुपयांपर्यंत] दंडाची शिक्षा होईल ; आणि

(ब) अशा अपराधसिद्धीनंतर ज्या मुदतीत अतिक्रमण करणारे बांधकाम किंवा काम काढून टाकून, पाडून किंवा मोकळे करून ती जागा मूळ स्थितीत पूर्ववत करणार नाही त्या मुदतीत प्रत्येक दिवसांबद्दल [२][पाचशे रुपयांपर्यंत] आणखी दंडाची शिक्षा होईल.

महामार्गाचा अनधिकृत भोगवटा.

**५७.** जो कोणी —

(अ) कलम २१, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणत्याही महामार्गाचा भोगवटा करील किंवा त्यावर कोणतेही अतिक्रमण करील, किंवा

(ब) कोणत्याही कायदेशीर कारणावाचून कलम २३, पोट-कलम (१) अन्वये त्याच्यावर बजावलेल्या नोटिशीचे अनुपालन करण्यास चुकेल,

त्यास सिद्धापराध ठरवण्यात आल्यावर :—

(अ) पहिल्या अपराधाबद्दल [३][एक हजार रुपयांपर्यंत] दंडाची शिक्षा होईल,

(ब) त्याच अतिक्रमणाच्या संबंधात नंतरच्या अपराधाबद्दल [४][दोन हजार रुपयांपर्यंत] दंडाची शिक्षा होईल, शिवाय ज्या दिवशी महामार्गाचा असा भोगवटा किंवा त्यावर अतिक्रमण करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्धल जास्तीत जास्त [५][प्रत्येक दिवसाबद्दल शंभर रुपयांपर्यंत] आणखी दंडाची शिक्षा होईल.

महामार्गांचे नुकसान करणे.

**५८.** जो कोणी, कलम ५४, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून कोणत्याही महामार्गाचे बुद्धीपुरस्सर नुकसान करील किंवा त्याच्या ताब्यातील कोणत्याही वाहनास अगर जनावरास तसे करू देईल त्यास, सिद्धापराध ठरवण्यात आल्यावर, एक हजार रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

अपराधांबद्दल शिक्षा करण्यासंबंधी सामान्य तरतुदी.

**५९.** जो कोणी, या अधिनियमाच्या किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, त्या अपराधाबद्दल इतर कोणत्याही शास्तीची तरतूद करण्यात आली असेल तर, सिध्दीपराध ठरवण्यात आल्यावर,—

(अ) पहिल्या अपराधाबद्दल [६][पाचशे रुपयांपर्यंत] दंडाची शिक्षा होईल,

---

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ११(अ) अन्वये "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ११(ब) अन्वये "शंभर रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १२(अ) अन्वये "दोनशे पन्नास रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १२(ब) अन्वये "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम १२(क) अन्वये "पन्नास रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम १३(अ) अन्वये "पन्नास रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) नंतरच्या अपराधाबद्दल [१] [एक हजार रुपयांपर्यंत] दंडाची शिक्षा होईल,

**६०.** महामार्ग प्राधिकाऱ्यास या अधिनियमान्वये केलेला कोणताही अपराध आपसात मिटवता येईल आणि जर कोणत्याही व्यक्तिविरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयात कोणतीही कार्यवाही दाखल करण्यात आली असेल तर, आपसात मिटवण्याच्या शर्तीचे पालन केल्यावर, असे मिटवणेही दोषमुक्ती समजण्यात येईल आणि कोणत्याही बाबतीत, त्याच गोष्टींच्या संबंधात अशा व्यक्तीविरुद्ध किंवा अशा व्यक्तीच्या कोणत्याही मालमत्तेविरुद्ध पुढे कोणतीही कार्यवाही चालवता येणार नाही. अपराधांसंबंधी तडजोड करण्याचा अधिकार.

प्रकरण नऊ

## किरकोळ

**६१.** प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याने या अधिनियमाविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमाविरुद्ध करण्यात आलेल्या व त्यास समजलेल्या अपराधाची माहिती निकटतम महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा महामार्ग प्राधिकाऱ्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यास ताबडतोब पुरवली पाहिजे आणि तो, महामार्ग प्राधिकाऱ्यांस व त्याच्या अधिकाऱ्यांस व कर्मचाऱ्यांस, त्यांच्या कायदेशीर प्राधिकाराचा वापर करण्यास सहाय्य करण्यास बांधलेला असेल. पोलिसांचे अधिकार व कर्तव्ये.

**६२.** प्रत्येक ग्रामप्रमुखाने, ग्राम लेखापालाने, गावाच्या पहारेकऱ्याने किंवा कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या इतर ग्राम कर्मचाऱ्याने, जेव्हा कोणत्याही महामार्गाचे कोणतेही सर्वेक्षण चिन्ह किंवा कोणतीही सीमेची खूण किंवा एखाद्या महामार्गाच्या संबंधात ठरवलेली पुरोभाग रेषा किंवा नियंत्रण रेषा दर्शवणारी कोणतीही खूण नष्ट करण्यात आली आहे, तिचे नुकसान करण्यात आले आहे, ती काढून टाकण्यात आली आहे, तिची जागा बदलण्यात आली आहे किंवा अन्यथा तिच्यामध्ये ढवळाढवळ करण्यात आली आहे किंवा कोणत्याही महामार्गाचे कोणतेही नुकसान करण्यात आले आहे किंवा कोणत्याही महामार्गावर अतिक्रमण करण्यात आले आहे असे त्यास कळून येईल तेव्हा, निकटतम पोलीस ठाण्यावर किंवा निकटतम महामार्ग प्राधिकाऱ्यास किंवा महामार्ग प्राधिकाऱ्याने यथोचित रीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास त्याबाबत ताबडतोब माहिती दिली पाहिजे. ग्राम कर्मचाऱ्यांची कर्तव्ये.

**६३.** महामार्ग प्राधिकाऱ्यास, महामार्गाचा भाग असलेली जी जमीन रहदारीस जाण्या-येण्यासाठी ताबडतोब आवश्यक नसेल त्या जमिनीचा रस्त्याला प्रयोजनांव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी तात्पुरता उपयोग करता येईल व अशा जमिनीच्या उत्पन्नाचा विनियोग करता येईल. रस्त्यांच्या प्रयोजनां-व्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी महामार्गाचा उपयोग करण्याचा अधिकार.

**६४.** जा कोणतीही जमीन,— तडकाफडकी काढून टाकणे.

(अ) एखाद्या महामार्गाचा भाग असेल,

---

१. वरील अधिनियमाच्या कलम १३(ब) अन्वये "दोनशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) भोगवट्यात घेतल्यामुळे या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होत असेल व उक्त तरतुदींमध्ये अशा व्यक्तींस काढून टाकण्याची तरतूद नसेल, त्या जमिनीचा अन्यायाने भोगवटा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा राज्य सरकारने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने तसे करण्यास जिल्हाधिकाऱ्याला सांगितल्यावर, यथास्थिति मुंबई शहर जमीन महसूल अधिनियम, १८७६ मध्ये किंवा मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ मध्ये [1][किंवा जमीन महसुलासंबंधी राज्याच्या कोणत्याही भागात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात] तरतूद केलेल्या रितीने जिल्हाधिकाऱ्याकडून तडकाफडकी काढून टाकले जाईल. १८७६ चा मुंबई २. १८७९ चा मुंबई ५.

संक्षिप्त चौकशी करणे.

**६५.** (१) महामार्ग प्राधिकाऱ्याने किंवा याबाबत राज्य सरकारने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी कोणतीही चौकशी करण्याची त्याची इच्छा असेल तर, अशी चौकशी, मुंबई शहर जमीन महसूल अधिनियम, १८७६ किंवा मुंबई जमीन महसूल संहिता, १९७९ [2][किंवा राज्याच्या कोणत्याही भागात त्यावेळी अंमलात असलेल्या जमीन महसुलासंबंधीच्या कोणत्याही कायद्या] अन्वये संक्षिप्त चौकशी करण्यासाठी तरतूद केलेल्या रितीने चौकशी केली पाहिजे आणि संक्षिप्त चौकशी करण्यासंबंधी उक्त अधिनियमात, संहितेत [3][किंवा कायद्यात] अंतर्भूत असलेल्या सर्व तरतुदी शक्य असेल तितपत अशा चौकशीत लागू होतील. १८७६ चा मुंबई २.

[4][मात्र, जेव्हा अशा कोणत्याही कायद्यात, संक्षिप्त रीतीने चौकशी करण्याची तरतूद नसेल तेव्हा अशी चौकशी त्या कायद्यात ज्या इतर रीतीने करण्याची तरतूद केली असेल त्याप्रमाणे केली पाहिजे.] १८७९ चा मुंबई ५.

(२) महामार्ग प्राधिकाऱ्यास व राज्य सरकारने किंवा महामार्ग प्राधिकाऱ्याने या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, कोणत्याही व्यक्तीला समन्स काढून बोलावण्यासाठी व तिला हजर राहण्यास भाग पाडण्यासाठी व शपथेवर तिची तपासणी व कागदपत्र सादर करण्यास भाग पाडण्यासाठी, मुंबई शहर जमीन महसूल अधिनियम, १८७६ किंवा मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ [5][किंवा राज्याच्या कोणत्याही भागात त्यावेळी अंमलात असलेल्या जमीन महसुलासंबंधीच्या कोणत्याही कायद्या] अन्वये महसूल अधिकाऱ्यांकडे जे अधिकार निहित असतील ते अधिकार असतील. १८७६ चा मुंबई २. १८७९ चा मुंबई ५.

कलम ८ अन्वये तयार केलेल्या नकाशाची नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

**६६.** (१) भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ मधील कोणत्याही गोष्टीमुळे कलम ८ अन्वये तयार केलेल्या कोणत्याही नकाशाची नोंदणी करण्याची आवश्यकता आहे असे मनले जाणार नाही. १९०८ चा १६.

(२) भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ कलमे ४९ व ५० यांच्या प्रयोजनांसाठी त्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशा सर्व नकाशाची नोंदणी करण्यात आली आहे व ते नोंदणीकृत आहेत असे मानले जाईल ; १९०८ चा १६.

मात्र, हे नकाशे विहित केलेल्या रितीने लोकांस पहाण्यास मिळण्याजोगे असतील.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ९ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (अ) (एक) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १० (अ) (दोन) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

४. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १० (ब) अन्वये हा मजकुर दाखल करण्यात आले.

१८६० चा ४५. **६७.** महामार्ग प्राधिकारी व या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेले किंवा नियुक्त केलेले अधिकारी व इतर व्यक्तीं भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असे मानले जाईल. विवक्षित व्यक्ती लोकसेवक असणे.

**६८.** जो कोणताही प्रश्न या अधिनियमान्वये किंवा तद्‌नुसार महामार्ग प्राधिकारी, जिल्हाधिकारी, या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा व्यक्ती, कलम ३५ किंवा ४४ अन्वये कोणताही प्राधिकारी किंवा राज्य सरकार यांनी मिटवणे, त्याचा निर्णय करणे किंवा हाताळणे आवश्यक असेल तो प्रश्न मिटवणे, त्याचा निर्णय करणे किंवा तो हाताळणे कोणत्याही दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेत असणार नाही. अधिकारितेस प्रतिबंध.

**६९.** (१) हा अधिनियम किंवा त्या अन्वये केलेले नियम किंवा आदेश या अन्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याच्या संबंधात या अधिनियमान्वये यथोचितरित्या प्राधिकृत केलेला कोणताही लोकसेवक, अधिकारी किंवा व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही वाद, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्‌भावनेने काम करणाऱ्या व्यक्तीचे संरक्षण व वाद किंवा खटला याची मुदत.

(२) या अधिनियमान्वये केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याच्या संबंधात या अधिनियमान्वये यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला कोणताही लोकसेवक, अधिकारी किंवा व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही वाद किंवा खटला, तक्रार केलेले कृत्य केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत असा वाद किंवा खटला दाखल केलेला असेल त्याखेरीज, दाखल करता येणार नाही.

**७०.** (१) या अधिनियमान्वये काढलेली किंवा तयार केलेली प्रत्येक नोटीस किंवा बिल,— नोटिसा व बिले बजावणे.

(अ) ज्या व्यक्तीला उद्देशून ती काढली असेल त्या व्यक्तीच्या किंवा तिच्या अभिकर्त्याच्या स्वाधीन करून किंवा त्यास देऊ करून किंवा पोस्टाने पाठवून, किंवा

(ब) अशी व्यक्ती किंवा तिचा अभिकर्ता सापडत नसेल तर ती त्याच्या नेहमीच्या किंवा शेवटी माहीत असलेल्या राहण्याच्या ठिकाणी ठेवून किंवा त्याच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ पुरुषाच्या स्वाधीन करून किंवा त्याला देऊ करून किंवा ती ज्या इमारतीसंबंधी किंवा जमिनीसंबंधी असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या, (तशी इमारत किंवा जमीन असल्यास) एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था करून, बजावता येईल किंवा सादर करता येईल.

(२) जेव्हा या अधिनियमान्वये नोटीस एखाद्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर बजावणे आवश्यक असेल तेव्हा, मालकाचे किंवा भेगवटादाराचे नाव देणे आवश्यक असणार नाही व ती —

(अ) त्या मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या किंवा मालक किंवा भोगवटादार एकापेक्षा अधिक असतील तर, त्यापैकी कोणात्याही एकाच्या स्वाधीन करून किंवा त्यास देऊ करून किंवा त्यास पोस्टाने पाठवून, किंवा

(ब) असा मालक किंवा भोगवटादार सापडत नसेल तर, त्याच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ पुरुषास किंवा नोकरास देऊन किंवा देऊ करून किंवा ती ज्या इमारतीसंबंधी किंवा जमिनीसंबंधी असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था करून बजावता येईल.

(३) ज्या व्यक्तीवर नोटीस किंवा बिल बजावयाचे आहे ती व्यक्ती, अवयस्क असेल तर तिच्या पालकावर किंवा तिच्या कुटुंबातील प्रौढ पुरुषावर किंवा नोकरावर बजावलेली नोटीस त्या अवयस्क व्यक्तीवर बजावली आहे असे मानले जाईल.

नियम करण्याचा अधिकार.

† **७१.** (१) राज्य सरकारला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या नियम अधीन या अधिनियमाचे सर्व किंवा कोणतेही उद्देश पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाधा येऊ न देता, राज्य सरकारला पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी नियम करता येतील :—

(अ) कलम ७ पो-कलम (२) अन्वये ज्या रीतीने अधिसूचना गावात किंवा [१] [ तालुक्याच्या, तहसिलाच्या किंवा महालाच्या ] मुख्यालयात प्रसिद्ध करता येईल ती रीत ;

(ब) कलम ८ अन्वये ज्या इतर ठिकाणी नकाशाच्या प्रती पाहण्यासाठी ठेवता येतील अशी अन्य ठिकाणे,

(क) कलम ९, पोट-कलम (२) अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यातील आशय ;

[२] [ " (ड) कलम १६ अन्वये भूमि संपादन अधिकाऱ्याला करता येतील अशा अन्य कृती किंवा गोष्टी ;

(ड-१) कलम १९-क अन्वये ज्या रीतीने रक्कम जमा करण्यात येईल ती रीत ] ;

(ई) ज्या शर्तीवर आणि भाडे किंवा आकार यांची जी रक्कम, दिल्यावर महमार्गावर अतिक्रमण करता येईल त्या शर्ती व ती रक्कम ;

(फ) कलम ३५ किंवा ४४ अन्वये ज्या रीतीने निर्देश करता येईल ती रीत ;

(ग) कलम ४७ अन्वये ज्या तारखेस सुधार आकार देय असेल ती तारीख आणि उक्त कलमाच्या परंतुकान्वये व्याजासहित द्यावयाचे हप्ते व असे हप्ते ज्या कालावधीत द्यावयाचे तो कालावधी ठरवणे ;

(ह) कलम ४८ अन्वये ज्या शर्तींवर कोणतीही जमीन राज्य सरकारच्या नावाने करता येईल किंवा तिची अदलाबदल करता येईल त्या शर्ती ;

(आय) कलम ५० अन्वये ज्या नियमांच्या अधीन कोणताही मार्ग किंवा त्याचा भाग रहदारीस किंवा रहदारीच्या कोणत्याही वर्गास बंद ठेवता येईल किंवा महामार्गाचा उपयोग करणाऱ्या वाहनांची संख्या व वेग किंवा वजन यांचे नियमन करता येईल ते नियम ;

---

† महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलात असलेले मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये केलेले नियम याद्वारा राज्याच्या उरलेल्या भागास लागू करण्यात येत आहेत (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ पहा).

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ११ (ई) अन्वये "तालुक्याच्या किंवा महालाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम १४ अन्वये खंड (ड) ऐवजी हे खंड बदली दाखल करण्यात आले.

(ज) कलम ५१ अन्वये ज्या नियमांच्या अधीन वाहने चालवण्यास मनाई करता येईल ते नियम ;

[१] [ (ट) महामार्ग वापराणाऱ्या व्यक्तींना पुढील दिसणार नाही अशा रीतीने, अडथळा केल्यामुळे किंवा त्याचे चित्त विचलित केल्यामुळे निर्माण होणाऱ्या धोक्याला प्रतिबंध करणे, आणि लोकांना होणारा उपद्रव, धोका व इजा यांस प्रतिबंध करणे ;]

(ल) महामार्गावर किंवा त्याच्या जवळपास होणारा अडथळा, अतिक्रमण किंवा उपद्रव यांस व महामार्गाच्या नुकसानीस प्रतिबंध करणे ;

(म) महामार्गाच्या सीमा व पुरोभाग रेषा आणि नियंत्रण रेषा यांचे सीमांकन करून त्या सुस्थितीत ठेवणे ;

(न) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये करणे आवश्यक असलेल्या अर्जाचे निरनिराळे नमुने व व्यक्तींवर बजावणे आवश्यक असलेल्या नोटिशींचे व बिलांचे नमुने, नकाशांच्या प्रती पुरवण्यासाठी घ्यावयाचे आकार व बसवावयाचे किंवा वसूल करावयाचे भाडे व इतर आकार विहित करणे ;

(ओ) या अधिनियमान्वये आपली कामे पार पाडण्यात महामार्ग प्राधिकाऱ्यास सर्वसाधारण मार्गदर्शन करणे ;

(प) जाण्यायेण्याच्या विद्यमान अधिकारांचे नियमन करणे किंवा ते वळवणे ;

(क्यू) विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

**७२.** (१) या कलमाच्या तरतुदींच्या अधीन, या अधिनियमातील कशानेही पुढील गोष्टीस बाधा येणार नाही— व्यावृती.

(अ) कोणताही मलप्रणाल, निःस्सारण, जलप्रवाह किंवा इतर काम बसण्याच्या, करणाच्या, बदलण्याच्या दुरुस्त करण्याच्या किंवा नवीकरण करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतेही उत्खनन करण्याचा कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्याचा अधिकार ; किंवा

(ब) गॅस किंवा पाणी, वीज, लोहमार्ग, ट्राममार्ग किंवा ट्रॉली गाड्या यासाठी त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याअन्वये नियुक्त केलेल्या प्राधिकाऱ्याचा कोणताही मुख्यवाहक, नळ, जलद्वार, बांध,वीजप्रवाहाच्या तारा, वाहिन्या, निःस्सारण किंवा इतर उपकरण संच बसवण्याच्या, करण्याच्या बदलण्याच्या, दुरुस्त करण्याच्या किंवा नवीकरण करण्याच्या प्रयोजनासाठी आधार म्हणून कोणतेही बांधकाम करण्याचा किंवा कोणतेही उत्खनन करण्याचा अधिकार ; किंवा

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ११ (ब) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ट) दाखल करण्यात आला.

(क) रेल्वे प्रशासनाच्या मालकीची किंवा भारतीय विद्युत अधिनियम, १९९० अन्वये विजेची निर्मिती, रूपांतर किंवा वाटप करण्यासाठी लायसन्स किंवा मंजुरी धारण करणाऱ्या व्यक्तीच्या मालकीची किंवा तिच्याकडून उपयोग करण्यात येत असलेली कोणतेही जमीन, जेव्हा अशी जमीन, यथास्थिति, रेल्वे प्रशासनाने किंवा अशा व्यक्तीने आपल्या रेल्वेच्या प्रयोजनासाठी किंवा विजेची निर्मिती, रुपांतर किंवा वाटप करण्यासाठी धारण केलेली असेल किंवा तिचा ती उपयोग करत असेल, तेव्हा, त्या गोष्टीस ते जितपत आपली संमती देतील त्याखेरीज ; किंवा १९१० चा ९.

(ड) छावणीच्या किंवा संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्या अन्वये किंवा विद्यमान कायद्या अन्वये किंवा तद्‌नुसार मुख्य बंदर म्हणून जाहीर केलेल्या बंदराच्या सीमेतील कोणतीही जमीन ; किंवा

(ई) केंद्र सरकारच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील स्थानिक प्राधिकाऱ्याच्या अधिकारितेतील कोणतीही जमीन :

मात्र :—

(एक) कोणत्याही रस्त्याकडे जाण्या-येण्याचा मार्ग बांधणे, तयार करणे किंवा त्याची आखणी करणे यासंबंधी कलम ९ अन्वये अंमलात असलेले कोणतेही निर्बंध हे, वर सांगितलेल्या कोणत्याही संमतीशिवाय, खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही जमिनीस, अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीखेरीज इतर जमिनीकडे किंवा जमिनीपासून अशा जमिनीवरून किंवा खालून तयार केलेल्या जाण्या-येण्याच्या मार्गाशी या निर्बंधाचा जितपत संबंध असेल तितपत, लागू असतील ; आणि

(दोन) या कलमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेली कोणतीही संमती, वाजवी कारणावाचून अडवून ठेवता येणार नाही आणि अशा रीतीने आवश्यक असलेली संमती वाजवी कारणावाचून अडवून ठेवली होती किंवा काय या प्रश्नाचा निर्णय राज्य सरकारने केला पाहिजे आणि त्या प्रश्नावर राज्य सरकारने दिलेला निर्णय अंतिम असेल.

(२) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टींमुळे भारतीय तारायंत्र अधिनियम, १९८५ याच्या तरतुदींन्वये तार प्राधिकाऱ्याच्या कोणतेही अधिकार व कामे यांस बाध येणार नाही. १८८५ चा १३.

[1]* * * * * * *

या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदी इतर कायद्यांमधील विसंगत तरतुदींवर अधिभावी होणे.

**७३.** कलम ७२ मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्या अन्वये केलेले नियम याअन्वये कार्यवाही केल्या जाणाऱ्या बाबींच्या संबंधात, राज्य विधानमंडळाने केलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या किंवा जो कोणताही कायदा करण्यास किंवा सुधारण्यास राज्य विधानमंडळ सक्षम असेल त्या कायद्याच्या तरतुदींवर जितपत असा कायदा, उक्त तरतुदींशी किंवा नियमांशी विसंगत असेल तितपत, अधिभावी होतील आणि अशी विसंगती असेल तितपत, असा कायदा अशा कोणत्याही बाबीस लागू असण्याचे बंद होईल किंवा लागू असणार नाही.

---

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम १५ अन्वये हे स्पष्टीकरण वगळण्यात आले.

**७४.** शंका टाळण्यासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट, संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये किंवा तद्नुसार राष्ट्रीय महामार्ग म्हणून जाहीर केलेल्या किंवा करण्यात आलेल्या महामार्गांना लागू असणार नाही ; राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूवरील पुरोभाग.

परंतु संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये किंवा तद्नुसार कोणताही महामार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून जाहीर केला असेल तर, राज्य सरकारने कलम ७ अन्वये उक्त महामार्गाच्या निरनिराळ्या भागांसाठी पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा निश्चित करणे [1] * * * [2] [किंवा असा महामार्ग बांधल्यामुळे किंवा बांधण्याचे योजल्यामुळे ज्या जमिनीचे मूल्य वाढले असेल त्या जमिनींवर कलम ४२ अन्वये सुधार आकार बसवणे] कायदेशीर असेल ; आणि त्यानंतर या अधिनियमाच्या तरतुदी, जितपत त्या महामार्गाच्या सीमा व पुरोभाग रेषा यांच्यामधील किंवा पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा यांच्यामधील इमारतींवरील निर्बंधास लागू असतील तितपत, आणि अशी पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा यासंबंधीच्या इतर तरतुदी [3] [किंवा यथास्थिति, सुधार आकार बसविण्यासंबंधी या अधिनियमाच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील]. रेषा व नियंत्रण रेषा [4] [आणि सुधार आकार बसवणे.]

१९६५ चा महा. ४२. [5] [**७५.** (१) मुंबई महामार्ग (विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६५ चा प्रारंभ झाल्यावर मध्यप्रांत वऱ्हाड जमिनीच्या उपयोगासंबंधी अधिनियम, १९४८ निरसित होईल : निरसन आणि व्यावृत्ती.

१९४८ चा म.प्रां. व वऱ्हाड ४७. परंतु, उपरोक्त अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढलेल्या कोणत्याही अधिसूचना किंवा दिलेली लायसन्स, ठेवलेले नकाशे, किंवा लादलेले निर्बंध, केलेले अर्ज आणि नियम, दिलेली परवानगी किंवा दिलेली भरपाई धरून) या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तितपत, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये केलेली आहे असे मानले जाईल. आणि तद्नुसार, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे, कार्यवाहीद्वारे, तिचे अधिक्रमण करण्यात आले नसेल तर व तोपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

१९०४ चा मुंबई १. (२) या कलमातील विशिष्ट बाबींचा उल्लेख, मुंबई सर्वसाधारण व्याख्या, अधिनियम, १९०४ याचे कलम ७ (जे निरसनाच्या परिणामासंबंधी आहे), या अधिनियमास सर्वसाधारणपणे लागू करण्यास बाध आणणार नाही].

## अनुसूची

[सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ४ अन्वये वगळण्यात आली.]

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १३ (अ) अन्वये " किंवा निश्चित न करणे " हे शब्द वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) अन्वये " योग्य त्या फेरफारांसह " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

४. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १३ (ड) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

५. कलम ७५ हे, सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १४ अन्वये दाखल करण्यात आले.